cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२६ | मंगळवार, दि.२० मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### भारताची भूमिका अधोरेखित करा!

भारताने पुन्हा एकदा सीमापार दहशतवादाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' या कारवाईनंतर संसदीय कामकाज मंत्रालयाने सर्वपक्षीय शिष्टमंडळ जाहीर केले. या शिष्टमंडळाचे उद्दिष्ट भारताच्या मुख्य मित्रराष्ट्रांमध्ये आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सदस्य असलेल्या देशांमध्ये भारताची भूमिका स्पष्ट करणे हे आहे. या निर्णयावरून देशात एकीकडे राष्ट्रीय सुरक्षेची एकत्रित मांडणी करावी अशी अपेक्षा असताना, दुसरीकडे राजकीय वाद आणि मतभेद उफाळून आले आहेत.

### सर्वोच्च न्यायालयाने व्होडाफोन आणि एअरटेलची याचिका फेटाळली

नवी दिल्ली : दूरसंचार क्षेत्रातील दिग्गज कंपन्या व्होडाफोन आयडिया आणि एअरटेल यांनी त्यांच्या दीर्घकाळापासून असलेल्या समायोजित एकूण महसूल (एजीआर) थकबाकीचा भाग म्हणून व्याज, दंड आणि दंड घटकांवर व्याज देण्यापासून सूट मागितली होती. डोकोमो ब्रँड अंतर्गत दूरसंचार सेवा चालवणाऱ्या टाटा टेलिकॉमनेही अशीच एक याचिका दाखल केली होती. जरी ही याचिका सूचीबद्ध नव्हती, तरी ती देखील आज न्यायालयाने मान्य केली आणि फेटाळून लावली. न्यायाधीश जे.बी. पार्डीवाला आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले की, या प्रकरणात दूरसंचार कंपन्यांनी दिलासा देण्यासाठी केलेल्या विनंत्यांमुळे ते अस्वस्थ आहेत.

# राज्यभरात अवकाळी पावसाने २७ हजार हेक्टर क्षेत्र बाधित

## कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची आढाव बैठकीनंतर माहिती

**नाशिक । प्रतिनिधी**

**राज्यभरात अवकाळी पावसाने २७ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याची माहिती कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. अमरावती जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक १३ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. तर नाशिकमध्ये ५ हजार ८०० हेक्टर क्षेत्र बाधित आहे. राज्यात फळ पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती माणिकराव कोकाटे यांनी दिली.**

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सोमवारी खरीप हंगाम आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच फटकारले. बैठकीला येताना अपूर्ण माहिती



असणाऱ्या आणि गैरहजर असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोकाटे संतापल्याचे पाहायला मिळाले. गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश देखील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले आहेत. त्याचबरोबर खरीप हंगामात कोणतेही अधिकारी रजेवर किंवा संपावर जाणार नाहीत, असा इशाराही माणिकराव कोकाटे यांनी दिला आहे. राज्यात खतांचा मोठ्या प्रमाणांत बफर स्टॉक असल्याची माहितीही माणिकराव कोकाटे यांनी दिली. खते आणि बियाणांचे लिंकिंग कोणी करणार नाही याच्या सक्त सूचना राज्यभरातील कृषी केंद्रांना दिल्या आहेत. बोगस बी बियाणे, खते देणाऱ्यावर गुन्हे दाखल केले जाणार असल्याचा इशारा देखील मामिकराव कोकाटे यांनी दिला

### अधिकाऱ्यांना रजेवर, संपावर न जाण्याच्या सूचना

खरीप हंगामात कोणताही अधिकारी रजेवर किंवा संपावर जाणार नसल्याच्या सूचना माणिकराव कोकाटे यांनी दिल्या आहेत. संप पुकारून शेतकरी आणि सरकारला कोणीही वेठीस धरणार नाही, अन्यथा प्रशासकीय कारवाई केली जाईल असा इशारा कोकाटे यांनी दिला आहे. दोन दिवसांनी मुख्यमंत्रीच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार आहे. त्यावेळेस कृषी विभाग तयार असल्याचे आश्वासन मी त्यांना देणार असल्याचे माणिकराव कोकाटे म्हणाले.

### नुकसानीची शेतकऱ्यांना तातडीने मदत करा – किसान सभा

राज्यभर मान्सून पूर्व वादळी पावसाने पिकांचे व शेतजमिनीचे अतोनात नुकसान होत आहे. खरीप पूर्व मशागतीची कामे यामुळे वाया गेली. फळबागा, भाजीपाला, उन्हाळी पीके आणि इतर उभ्या पिकांना पावसाचा मोठा फटका बसला. कमी वेळामध्ये अधिक पाऊस पडत असल्यामुळे शेतजमिनी व बांधबंधिस्ती अनेक ठिकाणी वाहून जात आहे. राज्य सरकारने या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी किसान सभेने केली आहे.

## थोडक्यात...

### विधानभवनाच्या प्रवेशद्वाराजवळ आग

विधानभवनाच्या प्रवेशद्वाराजवळ आग लागल्याची घटना उघडकीस आली आहे. अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी रवाना झाले आहे.

### स्व.देशमुख हत्या प्रकरणी मकोका न्यायालयात सुनावणी सुरु

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी बीडच्या विशेष मकोका न्यायालयात सुरू आहे. सरकारी वकील आणि आरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद सुरू आहे. कागदपत्र मिळालेले नसल्याचा दावा आरोपीच्या वकिलांनी केला आहे. पेंड्राइव्ह देखील अद्याप मिळाला नसल्याचे आरोपीच्या वकिलांचे म्हणणे आहे. दरम्यान, सरकारी वकील उज्वल निकम गैरहजर होते.

### मंत्री विजय शाह प्रकरणी माफी स्वीकारली जाणार नाही– सुप्रीम कोर्ट

नवी दिल्ली–मंत्री विजय शाह यांनी कर्नल कुरेशी यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले होते. या प्रकरणी सुप्रीम कोर्टाने आदेश दिले आहेत. मंत्री विजय शाह प्रकरणात स्थापन करा, मध्य प्रदेश सरकारने गठित करावी असे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. तसेच विजय शाह यांची माफी स्वीकारली जाणार नाही असे ही म्हटले आहे.

### तेलंगणात २१ माओवाद्यांना अटक

हैद्राबाद : तेलंगणात २१ माओवाद्यांना अटक करण्यात आली असून ७ रायफल, मॅगझिन आणि ४ अन्य शस्त्र जप्त करण्यात आली आहेत. तेलंगणातील मुलुगू जिल्ह्यात ही मोठी कारवाई करण्यात आली.

# बीडच्या विकासासाठी वाढीव निधी–उपमुख्यमंत्री अजित पवार

## जिल्हा नियोजनाचा ५७५ कोटींचा आराखडा सादर

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हयाच्या विकासासाठी मी स्वत: अर्थमंत्री म्हणून अधिकाधिक निधी देत आहे अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज दिली. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. आज झालेल्या बैठकीत जिल्हयाचा ५७५ कोटी रुपयांचा (सर्वसाधारण) आराखडा सादर करण्यात आला.**

या बैठकीस पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, खा. बजरंग सोनवणे,उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख तसेच आमदार धनंजय मुंडे उपस्थिती होती., समिती प्रतिनिधींमध्ये आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार नमिता मुंदडा, आमदार विजयसिंह



पंडित आदींनी या बैठकीत सहभाग घेतला. वर्ष २०२४–२५ चा आराखडा ४८४ कोटी रुपयांचा होता ही संपूर्ण रक्कम १०० टक्के खर्च झाली आहे. याचा आढावा देखील आजच्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पुढील वर्षीच्या प्रस्तावित आराखडयाबाबत सादरीकरण केले. मागील बैठकीतील इतिवृत्तावर या बैठकीत चर्चा होवून त्यास मंजुरी देण्यात आली. गुणवत्तापूर्ण कामे आणि पारदर्शी कामांवर भर द्या व दिलेली कामे वेळेत पूर्ण करा असे सांगून श्री पवार यावेळी म्हणाले की यापुढील काळात निधी जिल्हयाला थेट वर्ग न करता तो मुंबईहुन झालेल्या कामाच्या प्रमाणात जारी करण्याचे धोरण अंमलात आणले जाणार आहे. गतवर्षी ४८४ कोटींचा आराखडा होता परंतू प्रत्याक्षात ४४६.३० कोटी इतका अंतिम आराखडा मंजूर झाला होता यात वर्ष २०२५–२६ करिता १२८ कोटी रुपयांची वाढ करुन तो ५७५ कोटीच करण्यात आला आहे. २०२२–२३ च्या तुलनेत यंदाचा आराखडा दुप्पट आहे हे उल्लेखनीय. नियोजन ◀◀ पान २ वर

# बीड मतदारसंघातील महत्वकांक्षी कामांना ना.अजितदादांकडून सकारात्मक मंजुरी

## आ.क्षीरसागरांनी मानले बीड मतदारसंघाच्या वतीने आभार

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.१९) रोजी झालेल्या नियोजन समितीच्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाकांक्षी असलेले विविध विषय आणि विकासकामे ना.अजितदादा आणि समितीसमोर प्रस्तावित केली. त्यावर ना.अजितदादांनी प्रस्तावित केलेल्या विविध कामांना विकास निधी देण्यासाठी




सकारात्मकता दर्शवत, निधी मंजूरीसाठी आदेशीत केले. तसेच बीड मतदारसंघातील अनेक महत्वाच्या कामांना मंजुरी दिली. त्याबद्दल ◀◀ पान २ वर

# धनंजय मुंडे यांच्या मागणीला यश

## परळीतील जुन्या थर्मलच्या जागेत सौर ऊर्जा प्रकल्पासह नवीन संच उभारणीचा प्रस्ताव सादर करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आदेश

**परळी वै. । प्रतिनिधी**

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या परळी दौऱ्यात धनंजय मुंडे यांच्या एका महत्त्वाच्या मागणीला यश आले आहे. परळी येथील जुन्या औष्णिक विद्युत केंद्राच्या जागेत बंद असलेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेत नवीन मेगा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे यासह नवीन थर्मल मध्ये प्रस्तावित**



**संच क्रमांक ९ ची उभारणी करणे, राख प्रदूषण नियंत्रण उपाययोजना जुन्या विश्राम गृहाचे नूतनीकरण, संच क्रमांक ६ ते ८ साठी स्वतंत्र प्रशासकीय इमारत आदी मागण्याना सकारात्मक प्रतिसाद देत अजितदादा पवार यांनी याबाबत चे प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले आहेत.**

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी याबाबत सातत्याने मागणी केली होती, त्यानुसार या प्रस्तावाच्या अनुषंगाने आज संबंधित अधिकारी यांनी अजितदादा पवार यांच्या समक्ष सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी या सर्वच मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत ◀◀ पान २ वर

# अजित पवार बीडचे पालकमंत्री झाल्यानंतर गुन्हेगारी वाढली

## काँग्रेसच्या नाना पटोले यांचा आरोप; पुन्हा मफियाराज

**मुंबई । प्रतिनिधी**

अजित पवार हे २ जिल्ह्यांचे पालकमंत्री आहेत. अजित पवार बीडचे पालकमंत्री झाल्यानंतर अजून गुन्हेगारी वाढली, असा आरोप काँग्रेसच्या नाना पटोले यांनी केला आहे. अजित पवार ज्या दिवशी बीडचे पालकमंत्री झाले तेव्हा पुन्हा माफियांचे राज्य उभे राहिले आहे, असेही ◀◀ पान २ वर



### बीड जिल्ह्यात मोठे ऑपरेशन करावे लागेल : विजय वडेट्टीवार



बीड जिल्ह्यात मोठे ऑपरेशन करावे लागेल. तसेच बीडमधील गुन्हेगारी प्रवृत्तीला ठेचून काढावे लागेल, असे विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. तसेच १५ दिवसांपूर्वी रुजु झालेल्या बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी बदलीसाठी मुख्यमंत्र्याकडे अर्ज दिला, असा दावाही वडेट्टीवार यांनी केला.

# पाकिस्तानात गंभीर अन्नटंचाई!

## १ कोटी १० लाख नागरीक उपासमारीच्या उंबरठ्यावर, संयुक्त राष्ट्राने दिला इशारा

**न्यूयॉर्क । वृत्तसंस्था**

**दहशतवादाने पोखरलेल्या पाकिस्तानला जागतिक व्यासपीठावर भारताशी तुलना करण्याची खूप सवय आहे. तथापि, संयुक्त राष्ट्राच्या एका अहवालातून पाकिस्तानची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. पाकिस्तानातील १.१ कोटी नागरीक तीव्र भुकेच्या समस्येला तोंड देत आहेत, त्यापैकी अनेक जण उपासमारीच्या थेट उंबरठ्यावर आहेत. त्यावरून संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानला गंभीर इशाराही दिला आहे.**

पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्यासमोर पाकिस्तानचे हे गंभीर सत्य संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालाद्वारे उघड झाले आहे. दरम्यान, भारताने मात्र जागतिक अन्न संकटाच्या काळात अन्न पुरवठादार म्हणून स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. हा धक्कादायक अहवाल 'ग्लोबल रिपोर्ट ऑन फूड क्रायसिस २०२५' मध्ये नमूद करण्यात आला आहे, जो १६ मे रोजी संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेने प्रसिद्ध केला. विशेषत: बलुचिस्तान, सिंध आणि खैबर पख्तूनख्वा या संघर्षग्रस्त आणि गरीब भागांमध्ये अन्नटंचाईची परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८३.५० क्विंटल | २,५०० | २,९४५ | २,६९२ |
| ज्वारी/हायब्रिड: १३३.०० क्विंटल | १,८५० | ४,५३१ | २,३६६ |
| मका/लोकल:५४.०० क्विंटल | २,००० | २,१८० | २,११६ |
| तूर : ६.०० क्विंटल | ६,६०० | ६,७३० | ६,६४३ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १३२.५० क्विंटल | १,६०१ | २,६४० | २,४३३ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ११८.५० क्विंटल | ४,१०० | ४,३०० | ४,२२५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ५,४०० | ६,००० | ५,५८० |

# वैद्यनाथ मंदिराचे पौराणिक व प्राचीन महत्व कायम ठेवून विकास कामे व्हावीत- पंकजा मुंडे

## उप मुख्यमंत्री अजित पवारांनी घेतला तीर्थक्षेत्र विकास योजनेतील कामांचा आढावा



**परळी वै.। प्रतिनिधी**

**तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातंर्गत वैद्यनाथ मंदिर परिसरात जी कामे सध्या सुरू आहेत, ती दर्जेदार तर व्हावीतच पण त्याचबरोबर मंदिराचे पौराणिक व प्राचीन महत्व जपले जावे अशी सूचना राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केली.**

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे आज परळी दौऱ्यावर होते. ना. पंकजाताई मुंडे हया त्यांच्यासमवेत दौऱ्यात होत्या. सकाळी शहरात आल्यानंतर प्रभू वैद्यनाथाचे त्यांनी दर्शन घेतले. वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या मंदिर परिसरातील तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामांची त्यांनी उप मुख्यमंत्र्यासह पाहणी केली. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातंर्गत सुरू असलेल्या विविध विकास कामांची आढावा बैठक अजित पवार यांच्या उपस्थितीत शासकीय विश्रामगृह येथे झाली, त्यावेळी ना पंकजाताई मुंडे यांनी बैठकीत महत्त्वपूर्ण सूचना केल्या. आ. धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह सर्व संबंधित वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. पंकजाताई मुंडे पालकमंत्री असताना वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडयाची मुहूर्तमेढ रोवली गेली होती. १३३ कोटी रूपये त्यांनी त्यावेळी मंजूर केले होते. नंतर यात वाढ होऊन २८६ कोटीचा आराखडा मंजूर करण्यात आला. या अंतर्गत सुरू असलेल्या कामांना सध्या वेग आला आहे. ना. पंकजाताईंनी बैठकीत बोलताना म्हणाल्या, ही कामे दर्जेदार व्हावीत, भक्त निवास, दर्शन मंडप, मंदिर परिसर सुशोभीकरण, ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# भारताची भूमिका अधोरेखित करा!

भारताने पुन्हा एकदा सीमापार दहशतवादाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. ‘ऑपरेशन सिंदूर’ या कारवाईनंतर संसदीय कामकाज मंत्रालयाने सर्वपक्षीय शिष्टमंडळ जाहीर केले. या शिष्टमंडळाचे उद्दिष्ट भारताच्या मुख्य मित्रराष्ट्रांमध्ये आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सदस्य असलेल्या देशांमध्ये भारताची भूमिका स्पष्ट करणे हे आहे. या निर्णयावरून देशात एकीकडे राष्ट्रीय सुरक्षेची एकत्रित मांडणी करावी अशी अपेक्षा असताना, दुसरीकडे राजकीय वाद आणि मतभेद उफाळून आले आहेत. शिष्टमंडळात केंद्रीय परराष्ट्र राज्यमंत्री मीनाक्षी लेखी यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधीमंडळात भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. सुब्रह्मण्यम स्वामी, काँग्रेसचे लोकसभा खासदार डॉ. शशी थरूर, टीएमसीच्या महुआ मोईत्रा, डिएमकेचे टी. आर. बालू, बीजेडीचे भर्तृहरि महताब, जेडीयूचे राजीव रंजन सिंह, वायएसआर काँग्रेसचे विजय साई रे, अकाली दलाचे हरसिमरत कौर बादल आणि बहुजन समाज पक्षाच्या रितेश पांडे यांचा समावेश आहे. तर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिनजू यांनी माजी मंत्री रविशंकर प्रसाद, काँग्रेसचे नेते शशी थरूर, संयुक्त जनता दलाचे संजय झा, भाजपचे वैजयंती जय पांडा, त्रमुखच्या कनिमोळी,राष्ट्रवादी शरद पवारच्या सुप्रिया सुळे, शिवसेना शिंदे पक्षाचे डॉ. श्रीकांत शिंदे हे शिष्टमंडळ अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया, आणि संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात भेटी देऊन भारताने घेतलेली भूमिका समजावून सांगणार आहे.

या संपूर्ण प्रक्रियेतील एक लक्षवेधी मुद्दा म्हणजे काँग्रेस नेते डॉ. शशी थरूर यांच्याभोवती निर्माण झालेला वाद. उपलब्ध माहितीनुसार काँग्रेसने सुरुवातीला शिष्टमंडळात थरूर यांचे नाव दिले, मात्र पक्षाच्या एका गटाने त्यांच्या सहभागावर आक्षेप घेतला. थरूर हे परराष्ट्र व्यवहार समितीचे माजी अध्यक्ष असूनही, त्यांच्या कथित ‘स्वतंत्र’ भूमिकांमुळे पक्षश्रेष्ठींमध्ये संभ्रम निर्माण झाला. काँग्रेसने शेवटी थरूर यांचे नाव कायम ठेवले असले तरी, यावरून पक्षात मतभेद उघड झाले. दुसरीकडे, भाजपने शिष्टमंडळात सामील होणाऱ्यांची नावे जाहीर करताना पूर्णपणे नियंत्रण ठेवले. मात्र यावर टीका झाली की, भाजपने विरोधी पक्षांशी फारसा संवाद न करता शिष्टमंडळात जास्तीत जास्त आपले हितसंबंध जपले आहेत. शिष्टमंडळाच्या रचनेत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे महाराष्ट्र, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, केरळ अशा प्रादेशिक राजकीयदृष्ट्या प्रभावी राज्यांमधील महत्त्वाच्या पक्षांना नेतृत्वात स्थान न देण्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी करत यावर रोष व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटले की, ‘या शिष्टमंडळात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, तसेच तेलंगणा, पंजाबमधील प्रमुख विरोधी पक्षांची अनुपस्थिती लक्षवेधी आहे. हे सर्वपक्षीय नाही, तर सरकार-पुरस्कृत निवडक शिष्टमंडळ आहे’. राऊत यांच्या मतानुसार, सरकार आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची एकसंघ प्रतिमा उभी करत असले तरी, देशांतर्गत विविध मतांचा समावेश न झाल्यास ही प्रतिमा सशक्त होणार नाही. दोन्ही बाजूंच्या चुकांचा विचार करू. सरकारच्या बाजूने पाहिल्यास, दहशतवादाविरोधातील आंतरराष्ट्रीय भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न स्वागतार्ह आहे. मात्र शिष्टमंडळाची रचना करताना अधिक पारदर्शकता आणि सर्वपक्षीय सल्लामसलत अपेक्षित होती. प्रादेशिक पक्ष, जे अनेकदा राष्ट्रीय राजकारणात निर्णायक भूमिका बजावतात, त्यांना डावलल्याने सरकारवर पक्षपातीपणाचा आरोप झाला आहे. विरोधी पक्षांनीदेखील केवळ राजकीय हेतूने यावर टीका करण्याऐवजी, राष्ट्रहित लक्षात घेऊन संवाद आणि सहभाग वाढवायला हवा होता. काही विरोधकांनी

‘ऑपरेशन सिंदूर’ला निवडणूकपूर्व स्टंट म्हणून हिणवले, तर काहींनी कारवाईच्या वैधतेबद्दल प्रश्न उपस्थित केले. हे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या भूमिकेस हानी पोचवू शकणारे ठरू शकते. राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत भारताने एकत्रित आणि विश्वासार्ह छाप पाडणं गरजेचं आहे. त्यासाठी शिष्टमंडळ सर्वपक्षीय, सर्वसमावेशक आणि पारदर्शक असणं आवश्यक आहे. सरकारने भविष्यात अशा शिष्टमंडळात विरोधकांशी खुला संवाद साधावा, आणि विरोधकांनीही व्यक्तिगत मतभेद बाजूला ठेवून देशाच्या हितासाठी एकत्र आलं पाहिजे. ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतर भारताने उचललेली कूटनैतिक पावले हे देशाच्या संरक्षण नीतीचा भाग आहेत. मात्र शिष्टमंडळाच्या निवडीमुळे निर्माण झालेला वाद, सरकार आणि विरोधक या दोघांनीही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. दहशतवादाविरोधी लढा हा केवळ लष्करी नाही, तर कूटनैतिक आणि राजकीय एकतेचा लढा आहे तो लढताना विविध विचारधारांना समान वाव देणं हेच खरे लोकशाहीचे लक्षण ठरेल. मात्र केंद्राने थरूर यांचे नाव घेताना काँग्रेसला खिजवून त्यांच्या पक्षांतर्गत बाबींवर भाष्य करणे टाळले पाहिजे. आपली निवडणुकीच्या राजकारणाची हौस अशावेळी भागवून घेण्याचा प्रयत्न करू नये. केरळच्या साक्षर जनतेवर अशा खेळीचा परिणाम होईल असा स्मार्ट कॉस्मेटिक विचार करणाऱ्यांना वास्तवाचे भान असते तर ते असले राजकारण करत राहिले नसते आणि काँग्रेसनेही आपल्या पक्षात वेगळी भूमिका मांडू लागलेल्या आंतरराष्ट्रीय ख्याती असलेल्या नेत्याच्या बाबतीत त्याला जपण्याचे धोरण किमान लोकांतील प्रतिमा लक्षात घेऊन तर जपले पाहिजे. ज्यांनी थरूर यांची बदनामी समाज माध्यमावर केली त्यांना आता त्यांचा आधार घ्यावा लागतोय असे काँग्रेसचे बोलणे असते तर बात वेगळी असती. पण, त्यांच्या नेत्यांनीही चुकीचे धोरण अवलंबले. अशा परिस्थितीत ज्या गोष्टीकडे भारत म्हणून दोन्ही पक्षांनी पाहून या विषयावरील सार्वजनिक चर्चा आता थांबवावी. एकमेकांना कोंडीत पकडण्याच्या नादात भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा खराब होऊ नये आणि आपल्यातील मतभेदाचा फायदा शत्रू राष्ट्रांनी घेऊ नये या दृष्टीने दोन्ही पक्षांनी वाद टाळले पाहिजेत. नाहीतर हे शिष्टमंडळ आपसातील भांडणाची धुणी आंतरराष्ट्रीय कट्ट्यावर येऊन धूत आहेत असे जग म्हणेल. त्यामुळे असे वाद आणि घाईने देशांतर्गत कुटनीती साधण्याचे टाळलेलेच बरे. आपल्या पूर्वजांचा आंतरराष्ट्रीय विषयांवर होता तसाच ताळमेळ राखावा हीच अपेक्षा.

# आ.सुरेश धस यांच्या पुढाकाराने शहादेव नरवडे यांच्यावर मुंबई येथे शस्त्रक्रिया !

## ६ लक्ष रुपयांपर्यंतची मोफत शस्त्रक्रिया; नरवडे कुटुंबियांनी मानले आ.धसांचे आभार

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी मतदारसंघाचे लोकनेते आमदार सुरेश धस यांची मतदार संघामध्ये निरंतर रुग्णसेवा सुरू असून त्यांनी आत्तापर्यंत शिक्षण, आरोग्य, महिलांचे प्रश्न अशा विविध प्रश्नांवर त्यांनी चांगले काम केलं आहे. ते सातत्याने नाविन्यपूर्ण काम करण्यात अग्रेसर असतात. असेच त्यांच्याकडे आरोग्याचा विषय घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला ते नेहमी सहकार्यची भावना मनात ठेवत मदतीचा हात दिला आहे.**

आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथील शहादेव नरवडे यांची गेल्या अनेक दिवसांपासून गुडघ्याचा जॉईंटाचा त्रास होत असल्याकारणाने त्यांनी दोन ते तीन वेळा मुंबई व पुणे येथे ऑपरेशन केले परंतु त्यावरही त्यांचा त्रास कमी झाला नाही. त्यानंतर त्यांना डॉक्टरांनी ऑपरेशन करण्याचा सल्ला दिल्याने या ऑपरेशनसाठी पाच ते सहा लक्ष इतका खर्च खाजगी रुग्णालयांमध्ये येत होता तेव्हा त्यांनी आ.सुरेश धस यांची भेट घेत आपल्या वेदना सांगताच तात्काळ आमदार सुरेश धस यांनी या रुग्णाची मदत करण्याच्या हेतूने मुंबई येथील नामांकित हॉस्पिटलमध्ये विविध ट्रस्ट व मुख्यमंत्री सहायता निधीसह धर्मादाय यांच्याशी संपर्क करत विविध माध्यमातून मोफत शास्त्रक्रिया यशस्वीपणे केली.आ.सुरेश धस हे रुग्णांचा ईलाज करण्यासाठी त्यांच्यावर शस्त्रक्रिया



करण्यासाठी रुग्णसेवा देण्यासाठी नेहमी तत्पर असतात, ज्या गरिबांजवळ असाध्य रोगांवर उपचार करवून घेण्यासाठी पैसा नाही, ज्यांना मरणाशिवाय पर्याय नाही अशा रुग्णांना मदतीचा हात देण्याची भावना मनात असल्याने मतदार संघातील ग्रामीण भागांत राहणाऱ्या गरीब व कोणीही वाली नसलेल्या रुग्णांना स्वास्थ्य सुविधा पुरवविण्याचे काम करीत आहे. याच हुतात भावनेने शहादेव नरवडे यांना ६ लाख रुपयांची मोफत शस्त्रक्रिया मुंबई येथील रुग्णालयात आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून यशस्वी करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर नरोडे हे ठणठणीत बरे झाले असून आमदार सुरेश धस यांच्या या जागरूक पणामुळे फार मोठा आरोग्याचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे नरवडे परिवाराने आभार मानले.

# उच्च न्यायालयाकडून मराठा आरक्षण सुनावणीसाठी विशेष खंडपीठ स्थापन

**मुंबई । प्रतिनिधी**

**सरन्यायाधीश भूषण गवई यांनी दिलेल्या आदेशानंतर मराठा समाजाच्या आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी घेण्यासाठी उच्च न्यायालयाचे विशेष खंडपीठ स्थापन करण्यात आले आहे. यामध्ये न्या. रवींद्र घुगे, न्या. संदीप मागणे आणि न्या. निजामुद्दीन जमादार यांचा या विशेष खंडपीठात समावेश आहे.**

मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात १० टक्के आरक्षण देण्याचा कायदा राज्य सरकारने २०२४ मध्ये केला होता. मात्र या कायद्याच्या वैधतेला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. याशिवाय आरक्षणाच्या समर्थनार्थ आणि विरोधातही हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आल्या




आहेत. या याचिकांवर विशेष पूर्णपीठापुढे सुनावणी सुरू आहे. मात्र मुख्य न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी बदली झाल्यानंतर या याचिकांवर सुनावणी झाली नव्हती. दरम्यान, नीटसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्या याचिकांवरील सुनावणीप्रसंगी सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसी यांच्या खंडपीठाने मराठा आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर तातडीने सुनावणी घेण्यासाठी विशेष खंडपीठ स्थापन करण्याचे आदेश उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना दिले होते. त्यानुसार ही स्थापना करण्यात आलेली आहे.

# जलसंधारण कामास अडथळा केल्यास मी तिथे समोर येईल–तहसीलदार चव्हाण

**अंबड । प्रतिनिधी**

१९ मे रोजी जलसंधारण कामाबाबत सहविचार बैठक बोलावण्यात आली आहे. मा. उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार श्री विजय चव्हाण यांच्या अध्यक्षतेत समस्त महाजन ट्रस्ट, मुंबई च्या श्रीमती नुतन दीदी देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत तहसील कार्यालयात जलसंधारण करिता प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांची बैठक घ्यायची आहे. समस्त महाजन ट्रस्ट कडून विनामूल्य मिळालेल्या पोकलेन्ड मशीन द्वारे सुरु असलेल्या राष्ट्रीय कार्यासाठी मेहनत घेतलेल्या ग्रामस्थांशी संवाद साधणार आहेत. तसेच पावसाळ्या पूर्वी नाला, नदी, ओढ्या चे खोलीकरण आणि ताळ्यातील गाळ घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या मदतीने काम करुन घेण्यासाठी तात्काळ नियोजन करण्यात येणार आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबड श्री विजय चव्हाण यांच्या अध्यक्षतेत समस्त महाजन ट्रस्ट, मुंबई च्या श्रीमती नुतन दीदी देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत अंबड घनसावंगी तालुक्यात लोकसहभागातून सुरु असलेल्या पाणी टंचाई, दुष्काळ मुक्त करिता जलसंधारणाची कार्याला



प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांची तहसील कार्यालयात बैठक घेण्यात आली. समस्त महाजन ट्रस्ट कडून विनामूल्य मिळालेल्या पोकलेन्ड मशीन द्वारे सुरु असलेल्या राष्ट्रीय कार्यासाठी मेहनत घेतलेल्या ग्रामस्थांची उपस्थिती होती. यावेळी ओमप्रकाश उबाळे, दिलीप लोहकरे, डॉ वाय बी कुलकर्णी आदी मंडळींनी आपले मनोगत व्यक्त केले. श्रीमती नुतन दीदींनी नाला, नदी, ओढ्या चे खोलीकरण आणि ताळ्यातील गाळ घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांचे कौतुक करुन अभिनंदन केले. तसेच पावसाळ्या पूर्वी जास्तीत जास्त गावात कामे सुरु करुन घेण्यासाठी तात्काळ मशीन ची मागणी करावे असे आवाहन केले. याकार्यात प्रशासकीय यंत्रणा पूर्ण सहकार्य करेल, या राष्ट्रीय कार्याला कोणी अडथळा निर्णय करत असेल त्याठिकाणी मी स्वतः उभा राहून गती देईल असे तहसीलदार श्री विजय चव्हाण यांनी उपस्थित शेतकऱ्यांना हिम्मत दिली. यावेळी नारायण देवकते, श्रीमंत शेळके,चंद्रकांत मुळे, अमर अवघड, जगदीश जोशी, महादेव मते, अरविंद नवरे, जगन बरडे, सुरेश दीडपोळे, नरेंद्र जोगड, वाल्मिक कवडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी श्री देवा चित्राल यांनी सूत्रसंचालन करुन सुरू असलेल्या कामाचा प्रगती अहवाल सादर करुन शेवटी आभार मानले.

# पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकाम करताना राज्यभरासाठी एक समान ‘टाईप प्लॅन’ तयार करणार

## पशूसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांची जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत माहिती

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाचा घेतला आढावा



**बीड । प्रतिनिधी**

**नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकाम करताना यापुढे राज्यभरासाठी एक सारखा असा टाईप प्लॅन तयार करण्यात येणार असल्याचे राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.**

उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन विकास समितीची बैठक पार पडली, त्यावेळी ना. पंकजाताई बोलत होत्या. खरीप हंगाम पूर्व आणि जिल्ह्यातील विकास कामांचा आढावा तसेच जिल्ह्यातील महत्वाचे प्रकल्प असलेले प्रस्तावित विमानतळ, अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्ग, कृषी महाविद्यालय परळी, बिंदुसरा स्वच्छता, जिल्हा क्रीडा संकुल, शासकीय इमारती आदी विविध विषयांचा आढावा यावेळी बैठकीत घेण्यात आला. यावेळी बैठकीत बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या, अनेक ठिकाणी पशुवैद्यकीय महाविद्यालयाला नवीन इमारतींची गरज आहे. यापुढे नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतींचे बांधकाम करत असताना संपूर्ण राज्यभर एक सारखा असा टाईप प्लॅन तयार करून इमारती बांधल्या जातील. बीड व जालना जिल्ह्यात नवीन पशुवैद्यकीय दवाखाना बांधण्याकरिता राज्य स्तरावरून निधीची विशेष तरतूद करण्यात येईल असं ना. पंकजाताई मुंडे यावेळी सांगितलं. परळी येथे होत असलेल्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रस्तावित कामाचा बैठकीत आढावा घेण्यात आला.

## पान १ वरून...

### बीडच्या विकासासाठी

समितीमधील कोणतेही काम १५ लाख रुपयांपेक्ष कमी असू नये तसेच कामाचे तुकडे पाडण्यात येवू नयेत प्रस्तावित जागेची मालकी तसेच त्याचे अक्षांश-रेखांश प्रस्तावित सामिल हवे अशा अटी यावर्षी घालण्यात आलेल्या आहेत. कामाच्या ठिकाणी कामाच्या माहितीचे फलक अनिवार्य करण्यात आले असून कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान झाल्यावर १५ दिवसात त्याची निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असेल अशा सर्वसाधारण सूचना नियोजन विभागाने यावर्षी जारी केल्या आहे. वर्ष २०२५-२६ साठी ग्रामीण विकास अंतर्गत जनसूविधा व नागरी विकास २१ कोटी, जिल्हा आरोग्य अधिकारी १८.२ कोटी, जिल्हा शल्य चिकित्सक २८.५० कोटी, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय २० कोटी, प्राथमिक शिक्षण २८. ५० कोटी, जलसंधारण ३६ कोटी, महिला व बाल कल्याण १८. ३९ कोटी, ग्रामीण रस्ते १०५ कोटी रुपये आदीप्रमाणे नियोजन आहे. पशुधन विकासासाठी २२.२८ कोटींचा आराखडा आहे सोबतच राज्य शासन, सी.एस.आर. आणि नियोजन निधिमधून वेगळा दुग्धोत्पादन अर्थात धवल क्रांती योजना राबविण्याचा प्रस्ताव पशुधन विकास तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला. तो या बैठकीत स्विकारण्यात आला. यासोबत नागरी क्षेत्र विकास ६३. ६६ कोटी, उर्जा विकास ३१ कोटी, पोलीस व तुरुंग आस्थापना १६.३५ कोटी, महसूल व आपत्ती व्यवस्थापन ७. ४३ कोटी, क्रीडांगण विकास ४.२० कोटी रुपय असे नियोजन या आराखडयात आहे. बैठकीच्या आयोजनासाठी जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाणे व त्यांचे सहकारी यांनी परिश्रम घेतले निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

---------------

### परळीतील जुन्या थर्मलच्या जागेत सौर ऊर्जा

प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आज औष्णिक विद्युत केंद्रातील विविध मागण्यांसह परळी वैद्यनाथ येथील श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या कामांचाही समग्र आढावा घेण्यात आला. माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या सहमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नातून वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थस्थळाच्या व परिसराच्या विकासासाठी राज्य सरकारकडून २८६.६८ कोटी रुपयांच्या आराखड्यास मान्यता दिल्यात आलेली असून यातून विविध विकास कामे सुरू आहेत. या कामांना निधीची कमतरता कुठेही भासू देणार नाही मात्र अत्यंत दर्जेदार पद्धतीने व ठराविक वेळ येथे कामे पूर्ण केली जावीत असे अजित दादांनी स्पष्ट केले. बैठकीस अजितदादांसह मंत्री पंकजाताई मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे, आयुक्त राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांसह संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते. दरम्यान धनंजय मुंडे यांनी या मागणीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल उपुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

---------------

### बीड मतदारसंघातील महत्वकांक्षी कामांना

आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजितदादांचे बीड विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आभार मानले आहेत.

**खालील कामांना मिळाली मंजुरी**

बीडच्या विमानतळ उभारणी करता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी जागेची तांत्रिक क्षमता तपासणी करता प्रस्ताव सादर केलेला आहे. लवकरच हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे., बीड शहरात सेंटर फॉर इनोव्हेशन च्या उभारणीबाबत टाटा टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संमती दर्शवली आहे. त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी., शहरातील विद्यार्थी, विज्ञान व संशोधन प्रेमी तसेच नागरिकांसाठी सायन्स पार्क आणि तारांगण प्रस्तावास मान्यता देण्यात आली., जिल्हा रुग्णालय, बीड येथे शहरी व ग्रामीण भागातील रुग्णांसाठी महत्वाच्या सुविधा करिता भरीव निधीला मान्यता देण्यात आली., बिंदुसरा प्रकल्प तसेच बीड मतदार संघातून जाणार्या बिंदुसरा नदी पात्रात स्वच्छता व सुशोभीकरण कामे होणार आहेत.,. जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सिंथेटिक ट्रॅक व विविध क्रीडा सुविधा निर्माण करण्याची मागणी केली., बीड जिल्हा ग्रंथालय इमारत बांधकाम करण्यासाठी रोल मॉडेल तयार करण्याचे सुचविले., बीड शहरातील खुले भूखंड व उद्यान विकसित करण्यात येणार आहेत. शहरातील महत्त्वाचे डीपी रस्ते निर्माण करण्यात येणार आहेत. शहरातील महत्त्वाच्या चौकांचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. घनकचरा व्यवस्थापन व पाणी व्यवस्थापन करण्यात येणार आहे. , बीड मतदार संघातील पर्यटनाचे स्थळ असलेले युवा शांतीवन व सह्याद्री देवराई या ठिकाणी वन विभागामार्फत विविध विकासकामे करण्यात येणार आहेत.

---------------

### अजित पवार बीडचे पालकमंत्री

पटोले यांनी म्हटले आहे. नाना पटोले पुढे म्हणाले, संतोष देशमुख खून प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी चव्हाट्यावर आली असून गुन्हेगारांचे धाडस वाढले आहे. अजित पवार हे बीडचे पालकमंत्री झाले तेव्हापासून गुन्हेगारी पुन्हा वाढली असल्याचा आरोप पटोले यांनी केला आहे.

---------

### वैद्यनाथ मंदिराचे पौराणिक व प्राचीन महत्व

यासह भाविक भक्तांना चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात, मंदिराचे पौराणिक व प्राचीन महत्व कायम ठेवून विकास कामे व्हावीत याकरिता खबरदारी घ्यावी अशा सूचना यावेळी पंकजाताई मुंडे यांनी या बैठकीत केल्या.

**भाजप कार्यकर्त्यांकडून अजित पवार यांचे स्वागत**

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व ना. पंकजाताई मुंडे यांचे सकाळी ८ वा. हेलिकॉप्टरने शक्तीकुंज वसाहत येथील हेलिपॅडवर आगमन झाले. भाजप सह महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले. भाजपच्या शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, तालुकाध्यक्ष राजेश गिते, बंडू निर्मळ, माजी तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, वैद्यनाथ बॅकेचे अध्यक्ष विनोद सामत, विजय वाकेकर, संदीप लाहोटी, महादेव इटके, गणेश कराड आदींनी यावेळी त्यांचे स्वागत केले.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. २० मे २०२५
३

## कार पलटी होऊन माय-लेकीचा मृत्यू, तिघेजण गंभीर जखमी

जालना । प्रतिनिधी

कार पलटी होऊन या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील माय लेकीचा मृत्यू होऊन तीन जण गंभीर जखमी सदरील घटना

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी सकाळच्या सुमारास अंबड तालुक्यातील वडीगोद्री जवळील सौंदलगाव फाटा जवळ दुर्दैवी घटना घडली. या अपघातात एका मायलेकीचा जागीच मृत्यू झाला असून तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. छत्रपती संभाजीनगरहून बीड च्या दिशेने जात असलेल्या कारला सौंदलगाव फाट्याजवळ अपघात झाल्याने घटना घडली.कार पलटल्यामुळे अपघात झाला या अपघातामध्ये नुरवी अमरदीप चव्हाण वय अडीच वर्षे, रोहिणी अमरदीप चव्हाण वय ३० वर्षे, जखमीची नावे अमरदीप बाबूराव चव्हाण वय ४० वर्षे, विश्रांती प्रदीप चव्हाण वय २९ वर्षे, रुद्रांश प्रदीप चव्हाण वय २ वर्षे या अपघातात आई आणि तिच्या लहान मुलीचा जागीच मृत्यू झाला. इतर तिघे गंभीर जखमी असून, स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतीसाठी धाव घेत जखमींना पाचोड येथील ग्रामीण रुणालयात हलवले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत आणि त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसले तरी, या रोडवर वारंवार आपघाच्या घटना घडतात सदरील ठिकाणी रस्ता महामार्ग या विभागाने काहीतरी उपाययोजना करणे गरजेचे आहे. सदरील आपघात ठिकाणी घटनास्थळी ग्रामस्थांनी मदत केली. या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या दुर्घटनेने एकाच कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून, परिसरात शोककळा पसरली आहे.

# मुंबई - गोवा महामार्गाला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव द्या

## एस.एम.देशमुख यांची मागणी

**सिंधुदुर्ग नगरी । प्रतिनिधी**

**मुंबई - गोवा महामार्गाला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचं नाव द्यावं अशी मागणी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केली आहे..दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या १७९ व्या पुण्यतिथी निमित्त ओरस येथील बाळशास्त्री जांभेकर स्मारकात आयोजित अभिवादन सभेत एस.एम.देशमुख बोलत होते.**



अध्यक्षस्थानी पालकमंत्री नितेश राणे होते. एस.एम. म्हणाले, मुंबई - गोवा महामार्ग व्हावा यासाठी पत्रकारांनी २००५ रोजी वडखळ येथे पहिले आंदोलन केले..त्यानंतर रस्त्यावर उतरून सतत त्याचा पाठपुरावा केला.. त्यामुळे २०१२ मध्ये रस्त्याचे काम सुरू झाले मात्र विविध कारणांनी ते १२ वर्षे रखडले.. त्यानंतरही काम लवकर व्हावे यासाठी कोकणातील पत्रकार आंदोलन करीत राहिले.. केवळ पत्रकारांचा लढा आणि १७ वर्षे सलग पाठपुरावा केल्याने हे काम मार्गी लागत आहे.. पत्रकारांचा लढयामुळे हा मार्ग होत असलयाने महामार्गाला एका पत्रकाराचे नाव देणे औचित्यपूर्ण ठरेल..

बाळशास्त्री जांभेकर हे केवळ पत्रकार नव्हते, ते विचारवंत होते, शिक्षक होते, भाषा प्रभू होते, सामाजिक कार्यकर्ते होते, आणि ते कोकणातले होते.. त्यामुळे महामार्गाला त्यांचे नाव देऊन उचीत स्मारक करावे अशी मागणी देशमुख यांनी केली..

परदेशात साहित्यिक, विचारवंत, पत्रकारांचे पुतळे आहेत, त्यांची नावं रस्त्यांना आहेत.. आपल्याकडे फक्त नेत्यांची किंवा त्यांच्या आई वडिलांची नावं रस्त्यांना देण्याची पध्दत आहे.. या महामार्गाला बाळशास्त्री जांभेकर यांचं नाव देऊन सरकारनं एक नवा पायंडा पाडावा अशी सूचना एस.एम.देशमुख यांनी केली.. हिंदीचे आद्य पत्रकार बाबूराव पराडकर देखील कोकणातील पराड गावचे.. तेथे त्यांचेही स्मारक व्हावे अशी मागणीही देशमुख यांनी केली. आपल्या भाषणात नितेश राणे यांनी देशमुख यांच्या मागण्यांच्या सोडवणुकीसाठी आपण प्रयत्न करू असे आश्वासन दिले असले तरी महामार्गाला बाळशास्त्री जांभेकर यांचं नाव देण्याच्या मागणीवर त्यांनी सोयीस्कर मौन बाळगले. अभिवादन सभेसाठी राज्यभरातून परिषदेचे १०० पदाधिकारी उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र चाकरवाडीच्या शिवपुराण महाकथेत माजलगावकर करणार पाच लक्ष भाविकांना अन्नदान

## माजलगावात माउली भक्तांनी केला बैठकीत संकल्प

माजलगाव । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महानसंत ज्ञानेश्वर माउली यांच्या पुण्यतिथी निमीत्त श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे सप्ताहामध्ये राष्ट्रीय संत शिवभक्त पारायणकार प. पु. प्रदिपजी मिश्रा यांच्या अमृतमय वाणीतुन शिवमहापुराण कथा व ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या शिवमहापुराण कथेस प्रतिदिन पाच ते सात लाख शिवभक्त जमतील असा अंदाज आहे. या शिवमहापुराण कथेसाठी एक दिवसाच्या पाच ते सात लक्ष भाविकांच्या अन्नदानाचे नियोजन माजलगाव तालुक्यावर सोपविले असुन त्याचा संकल्प येथील माउली भक्तांनी बैठकीत केला आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी विसाव्या शतकातील महानसंत विभुती प. पु. माउली महाराज चाकरवाडीकर यांच्या रौप्यमहोत्सवी पुण्यतिथीनिमीत्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वर पारायण व श्री शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञ



सोहळा दि. ८ जुन ते १४ जुन २०२५ दरम्यान होणार आहे. कथा प्रवक्ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील प. पु. प्रदिपजी मिश्रा हे आहेत. या सप्ताहास येणा-या लाखो भाविकांकरीता एक दिवसीय अन्नदान पुरविण्याचा संकल्प माजलगाव तालुक्यातुन करण्यात आला. शहरातील जुना मोंढ्यातील गणेश मंदिरात नुकतेच पार पडलेल्या बैठकीत संकल्प करण्यात आला असुन निधी संकलनास सुरूवात करण्यात आली आहे. एक ते दिड कोटी रूपयांचा निधी या देवकार्यासाठी लागणार असुन भाविकांतुन भरघोस असा निधी दिला जात आहे. त्यामुळे लवकरच हा निधी जमा होणार आहे. बैठकीस सुरेंद्र रेदासणी, डॉ. भारत वाघमोडे, रविंद्र कानडे, डॉ. शंकर जुजगर, गोविंद बजाज, नारायण सातपुते, धनराज बंब, गणेश भंडारी, मथुरादास लाहोटी, पांडुरंग चांडक, गोविंद करवा, गणेश लोहिया, विष्णु करवा, डॉ. अशोक तिडके, अमोल सरवदे, बाळु ताकट, विष्णु मुंदडा, उमेश मोगरेकर, तुकाराम येवले, विनायक रत्नपारखी, दत्ता महाजन, अविनाश कांडुरे यांचेसह शेकडो माउली भक्त उपस्थित होते.

## संत जयगुरु माऊली माध्यमिक विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम

### साक्षी घवाडे ९२.२०% गुण घेऊन पेंडगाव केंद्रातून प्रथम!

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील माळापुरी येथील संत जयगुरु माऊली माध्यमिक विद्यालय माळापुरी या शाळेचा नुकत्याच घोषित झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत उज्वल यश मिळवले. या शाळेचा निकाल ९६.२०% टक्के लागला. शाळेतून कु. साक्षी जयराम घवाडे ९२.२०% गुण घेऊन शाळेसह केंद्रात पहिली आहे. कु. सोनाली सुनील परदेशी ८८.२०% गुण घेऊन शाळेतून द्वितीय तर कु. निकिता ज्ञानेश्वर परदेशी हिने ८७.४०% गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळविला. त्याच बरोबर कु. पुनम अण्णाभाऊ वावरे ८६.४०%, कु. श्रावणी मधुकर डोंगरे ८५.६०%, कु.लक्ष्मी नारायण परदेशी ८४.८०%, कु. श्रद्धा नितीन रंगदळ ८४.४०%,चि.गणेश ज्ञानेश्वर परदेशी ८३.८०%, चि. शेख अरमान रौफ ८२.५०%, चि. शेख नुमान आलम ७८.८०%, कु.पायल अरुण डोंगरे ७६.००% कु. शेख अकिब मुनीर ७०.००% या प्रमाणे अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व शाळेच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सौ. विद्याताई डोंगरे, शाळेचे मुख्याध्यापक श्री. जितेंद्र डोंगरे



सर यांच्यासह शिक्षक व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, माळापुरी गावातील शिक्षण प्रेमी नागरिक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सख्या चुलल्यानेच केला पुतणीवर अत्याचार, आरोपीच्या नैसर्गीक मृत्युपर्यंत आजीवन कारावासाची सुनावली शिक्षा

### अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश १ बीड यांचा महत्वपूर्ण निकाल

बीड । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पिडीत अल्पवयीन मुलीवर (पुतणीवर) बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आष्टी तालुक्यातील रहिवासी असलेला आरोपीस अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश -१ बीड मा. एस.आर पाटील मॅडम यांनी कलम ३७६ (२) (), ३७६ (२) (), ३७६ (३) भादवी व कलम ६ बाल लैंगीक अत्याचारः प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये दोषी ठरवुन कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये आरोपीच्या नैसर्गिक मृत्युपर्यंत आजन्म कारावास व २५,०००/- रूपये दंड तसेच कलम ५०६ भादवी अन्वये ६ महिने साधा कारावास व ५००/- दंड व दंड न भरल्यास १५ दिवसांचा साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.



प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, ऑगस्ट २०२३ मध्ये पिडीतेच्या पोटदुखीच्या आजारावरून डॉक्टराकडे तपासणीसाठी घेउन गेल्यानंतर संबंधीत डॉक्टरांनी पिडीतेस पुढील तपासणीसाठी अहिल्यानगर (अहमदनगर) येथील तज्ञ डॉक्टराकडे पाठविले असता तज्ञ डॉक्टरांच्या तपासणी मधे पिडीता हि ७ महिन्याची गरोदर असल्याचे निर्दशनास आले त्यावरून पिडीतेच्या आईने पिडीता हि १३ वर्षाची अज्ञान बालिका असुन तिचे अज्ञानाचा फायदा घेउन आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला अशा अशयाच्या फिर्यादी दिली. त्यावरून प्रस्तुत प्रकरणातील आरोपी विरूद्ध तोफखाना पो.स्टे अहिल्यानगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला व सदर गुन्हा हा अंभोरा पो.स्टे ता. आष्टी जि. बीड च्या कार्यक्षेत्रात येत असल्याने सदरील गुन्हा पो.स्टे अंभोरा ता. आष्टी यांच्याकडे तपासासाठी वर्ग करण्यात आला. सदर तपासादरम्यान फिर्यादी व इतर साक्षीदार व वैद्यकीय पुरावा यावरून प्रस्तुत प्रकरणातील अरोपी विरूद्ध सबळ पुरावा आढळल्याने विशेष सत्र न्यायालय बीड येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणाचा तपास सुरवातीला ए.पी.आय श्री बी. सी. गोसावी, ए.पी.आय श्री डी.बी कोळेकर व त्यांनतरम.स.पो.नि. अ.मा.वा.प्र. कक्ष श्रीमती सुरेखा. एस.धस यांनी केला.

सदर प्रकरणात आरोपी विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्याकामी पिडीता, फिर्यादी, डॉक्टर, न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा येथील तज्ञ व इतर एकुण १८ साक्षीदार तपाण्यात आले. सदर प्रकरणात पिडीतेचा पुरावा त्याचबरोबर पिडीतेबाबतचा वैद्यकीय पुरावा व प्रकरणातील डी.एन.ए. तपासणी अहवाल व इतर साक्षीदार यांचा पुरावा व सहा. सरकारी वकिल अनिल बी. तिडके यांचा युक्तीवाद ग्राहय धरुन मा. एस. आर पाटील मॅडम अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश १ बीड यांनी प्रस्तुत प्रकरणातील आरोपीस कलम ३७६ (२) (),३७६ (२) (),३७६ (३) भादवी व कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये दोषी ठरवुन कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये आरोपीच्या नैसर्गिक मृत्युपर्यंत आजन्म कारावास व २५,०००/- रूपये दंड तसेच कलम ५०६ भादवी अन्वये ६ महिने साधा कारावास व ५००/- दंड व दंड न भरल्यास १५ दिवसांचा साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.सदर प्रकरणात सहा. सरकारी वकिल अनिल बी. तिडके व ॲड. अजय दि. राख जिल्हा सरकारी वकिल, बीड यांनी काम पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी पोलिस हवालदार ११४ बी बी. शिंदे तसेच अंभोरा पोलिस स्टेशनच्या महिला पोलिस कर्मचारी एस.आर जेव्हे यांनी सहकार्य केले.

## कोविड वारिअर रेणुका फाउंडेशनच्या वतीने अनाथालयात अन्नदान व शालेय साहित्याचे वाटप

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील कोविड वारिअर रेणुका वाघमारे यांच्या तिस-या पुण्यस्मरण दिनानिमीत्त वडवणी तालुक्यातील ढेकणमोहा येथील अनाथालयातील पसायदान मुलांना खाउ, शालेय साहित्य तसेच एक आज दि. १६ मे २०२५ रोजी करण्यात आले.



येथील रेणुका अभिमन्यु वाघमारे/ गवळी या शासकीय रुग्णालयात नर्स म्हणुन कार्यरत होत्या तर कोरोना काळातही त्यांनी उल्लेखनिय कार्य केलेले आहे. याकाळातच त्यांना देखिल कोरोनाची लागण झाली आणि यातच त्यांचा मृत्यु झाल्याची दुःखद घटना २०२१ मध्ये घडली. तेंव्हापासुन वाघमारे कुटूंबीयांनी कोविड वारिअर रेणुका फाउंडेशनची स्थापना केलेली असुन त्या फाउंडेशनच्या अंतर्गत विवीध समाजोपयोगी उपक्रम राबविलेले आहेत. यामध्ये संविधान दिनानिमीत्त सर्व शासकीय कार्यालयात संविधानाची प्रत वाटप, रक्तदान शिबीर, शासकीय रुग्णालयात फळ वाटप, शासकीय रुग्णांलयातील गोर, गरिब, गरजुवंत रुग्णांना आर्थिक मदत असे विवीध सामाजिक उपक्रम राबवित त्यांच्या स्मृती जपण्याचे काम केले आहे. यावर्षी देखिल स्व. रेणुका वाघमारे / गवळी यांच्या चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त वडवणी तालुक्यातील ढेकणमोहा येथील पसायदान अनाथालयातील मुलांना खाउ, शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे सचिव रमेश गवळी,अध्यक्ष अनिकेत वाघमारे, पसायदानचे अनाथालयाचे श्री. दराडे, श्रीमती दराडे व अनाथालयातील चिमुकले व वाघमारे कुटूंबीय उपस्थित होते. दरम्यान मिळालेल्या खाउने चिमुकल्या अनाथ विद्यार्थ्यांच्या चेह-यावर हास्य उमलले होते.

## जालना जिल्ह्यात यलो अलर्ट; वारा,पावसाची शक्यता; आज अंबड तहसील कार्यालयात बैठक

**जालना । प्रतिनिधी**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दि. २० मे व २२ मे २०२५ रोजी यलो () अलर्ट जारी केला असुन यासंदर्भात आज अंबड तहसील कार्यालयामध्ये सर्व अधिकाऱ्यांची बैठक होणार आहे या बैठकीला अंबड शहरातील सर्व अधिकाऱ्यांनी हजर राहावे असे आवाहन तहसीलदार विजय चव्हाण यांनी केले आहे.तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच २३ मे २०२५ रोजी ढगांच्या गडगडाटासह हलका पाउस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे.वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतक-यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहजन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गणेश महाडिक यांनी शासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

पान ६ वरून...

### हुमणी नियंत्रणासाठी सामूहिक

धनराज पवार यांच्यासह इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

असा तयार करा एरंडी आंबवन सापळा

२ किलो एरंडी बिया ठेचुन त्यात १०० मिली ताक किंवा बेकरीतील २५ ग्रॅम इस्ट पावडर व ५० ग्रॅम बेसन पीठ एकत्र करुन १ ते १.५ लिटर पाण्यात टाकुन मिश्रण ढवळून घ्यावे तयार मिश्रण पसरट अंडाकृती मातीच्या मडक्यामध्ये दोन दिवस आंबवुन घ्यावे. दोन दिवसानंतर मडके अर्धे होईल इतके पाणी मिश्रणात मिसळावे व मडक्याचे तोंड उघडे ठेवुन मडके पिकामध्ये किंवा पिकालगतच्या कडुलिंब बाभळ बोर चिंच या झाडांखाली जमिनीत अर्धे पुरावे. या द्रावणात असंख्य प्रमाणात हुमणीचे प्रौढ भुंगेरे अडकून नष्ट होतात.

शिवप्रसाद येळकर, ऊस विकास अधिकारी, नॅचरल शुगर रांजणी.

असे करा ऊसातील चाबुक काणी, गवताळ वाढ, कांडी कीड व्यवस्थापन

चाबुक काणी प्रादुर्भावग्रस्त उसाचे फुटवे विळ्याने कापून घेऊन त्याची काजळी शेतामध्ये पडू न देता व्यवस्थित प्लास्टिकच्या पोत्यात भरून शेता बाहेर नेऊन जाळून टाकावेत त्यानंतर जमिनीखाली राहिलेले उसाचे बेट इतर अवशेष काढून नष्ट करावेत यामुळे रोगाचा प्रसार कमी होण्यास मदत होईल. * ऊस पिकात काणी रोगाचे प्रमाण ३ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास अशा पिकाचा खोडवा घेऊ नये.* चाबुक काणी रोगाच्या प्रादुर्भाव व्यवस्थापनासाठी ॲझॉक्सीस्ट्रॉबीन १८.२ टक्के अधिक डायफेनोकोनाझोल ११.४ टक्के एससी या संयुक्त बुरशीनाशकाची १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.* गवताळ वाढीची बेटे आढळल्यास ती मुळासकट काढून जाळून नष्ट करावीत.* फुले २६५ ऊस जातीच्या संकरातून तयार झालेल्या ऊस जातीमध्ये तांबेरा, पानांवरील तपकिरी ठिपके या बुरशीजन्य रोगांच्या व्यवस्थापनासाठी ३ ग्रॅम मॅन्कोझेब प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. * ऊस पिकातील कांडी कीड व्यवस्थापनासाठी क्लोरअँट्रानिलीप्रोल (०.४ टक्का) हे दाणेदार कीटकनाशक हेक्टरी १८.७५ किलो याप्रमाणे पावसाळी खतासोबत पेरून द्यावे.शिवप्रसाद येळकर, ऊस विकास अधिकारी, नॅचरल शुगर रांजणी.

### राज्याचे उपमुख्यमंत्री ना अजितदादा

त्याचबरोबर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष प्रमुख म्हणून आमच्याकडून लागेल ते सहकार्य करण्याचे आश्वासन देखील ना अजितदादा पवार यांनी मोदी निवास येथिल भेटीदरम्यान राजकिशोर मोदी यांना दिले.या भेटीत दादांनी बीड जिल्ह्यासह अंबाजोगाई शहराचा विकास कसा करता येईल याबाबत सविस्तर चर्चा केली. तसेच यावेळी दादांना भेटायला आलेल्या अभ्यंगतांच्या विकासात्मक निवेदनांचा स्वीकार करत या सर्व निवेदनाबाबत आपण सकारात्मक विचार करू असेही आश्वासन यावेळी अजितदादा पवार यांनी निवेदनकर्त्यांना दिले.

# केज तालुक्यात अवकाळी पावसाचा कहर

## उन्हाळी कांदा उत्पादक शेतकरी संकटात, काढणीला आलेला कांदा पाण्यात


**सारणी । दिनकर जाधव**

यावर्षी मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने जोर दारला असून केज तालुक्यातील अनेक उन्हाळी पिक उत्पादन करणारे शेतकरी संकटात सापडले असून यावर आता सरकार काही मदत करते का? असा प्रश्न आता शेतकऱ्यांना पडला आहे.

यावर्षी मे महिन्याच्या मध्यावधीपासूनच अवकाळी पावसाने जोर पकडला असून हा अवकाळी जोर दि.०२ जून पर्यंत राहणार असल्याचे काही हवामान तज्ञांनी सांगितले आहे. त्यामुळे यावर्षी उन्हाळी कामापासून शेतकरी दूरच राहिला असून शेतीची मशागत करण्यासही शेतकऱ्यांना अवकाळी पाऊस वेळ देईल का नाही अशी शंका आता शेतकऱ्यांना येत आहे. एवढे असतानाही या अवकाळी पावसाच्या तडाख्यात मात्र कांदा उत्पादक शेतकरी सापडला आहे. उन्हाळी कांदा हा कांदा आता काढणीच्या वेळेस हा अवकाळी पाऊस जोर पकडल्याने हाताशी आलेला घास पूर्णपणे डोळ्या देखत नष्ट होणार असल्याने या शेतकऱ्यांमध्ये निराशाचे वातावरण दिसून येत आहे. कारण उन्हाळ्यामध्ये पाण्याची कमतरता असतानाही थेंब थेंब वाचवून या कांदा पिकाला शेतकऱ्यांनी हाताच्या फोडाप्रमाणे जपले आणि वाढवले. परंतु कांदा पीक आता काढणीला आला आहे आणि त्यातच हा अवकाळी पाऊस जोर पकडला असून अनेक शेतकर्यांच्या कांदा पिकाच्या शेतामध्ये पाणीच पाणी दिसत असल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे या शेतकर्यांना सरकारने सरसकट मदत करावी आशी मागणी शेतकरी करत आहेत.

> सद्या उन्हाळी कांदा काढणीला आला आहे. त्यामध्येच अवकाळी पाऊस झाल्याने हा शेतात असलेला कांदा संपूर्णपणे खराब होऊ जाणार आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकर्यांचे हे फार मोठे नुकसान आहे.
> -- अशोक (बाळू) जाधव, शेतकरी सारणी

> कांदा उत्पादक शेतकर्यांना सरकारने सरसकट मदत देऊन नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकर्यांना मदत करुन शेतकर्यांना यातून बाहेर काढावे.
> -- बी.सी.ठोंबरे, सारणी सां



## टी.सी.हरवला आहे

छाया विठ्ठलराव नागरगोजे रा. बनकरंजा ता. केज जि. बीड यांचा ९ वी पास चा टीसी व इत्तर कागदपत्रे केज अंबाजोगाई प्रवासात हरवले आहेत तरी कोणाला आढळून आल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

-::संपर्क::- मो.९६२३०१२०८५

# पीककर्ज नाकारणाऱ्या बँकांविरुध्द कायदेशीर कारवाई करणार

## महसूल मंत्री तथा चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा

नागपूर : शेतकऱ्यांना वेळेवर मदत व्हावी, त्यांना आर्थिक अडचणीतून मार्ग मिळावा या उदात्त दृष्टीकोनातून शासनाने पीककर्ज योजना सुरु केली. पात्र शेतकऱ्यांनी याचा अत्यंत मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. जे शेतकरी घेतलेल्या पीककर्जाची वेळेत परतफेड करु शकले नाहीत त्यांनी ओटीएस समझोता अंतर्गत कर्जाची रक्कम फेडली. ओटीएस अंतर्गत शेतकऱ्यांनी कर्जफेड करुनही ज्या बँकांनी त्यांना पीककर्ज दिले नाही त्या बॅकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

नियोजन भवन येथे झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार डॉ. आशिष देशमुख, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिणा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, प्रभारी जिल्हाधिकारी प्रदीप कुलकर्णी, प्रभारी पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, माजी आमदार सुधीर पारवे, अग्रणी बँक व्यवस्थापक मोहित गेडाम व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांवर पीक कर्जाबाबत कुठलाही अन्याय होऊ नये यासाठी प्रत्येक तालुक्याला उपविभागीय दंडाधिकारी, अग्रणी बँक व्यवस्थापक यांनीही वेळोवेळी बँक



व्यवस्थापकांना बोलावून रितसर आढावा घेतला पाहिजे. संबंधित बँका निर्देश देऊनही जर ऐकत नसतील तर त्यांच्याविरुध्द गुन्हे का दाखल करु नयेत, असा संतप्त सवाल पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. महसूल विभागाच्या अंतर्गत असलेल्या नाल्यांवर अतिक्रमणांचा विळखा वाढल्याने पावसाळ्यात अतिवृष्टी नसतांनाही पूर सदृष्य परिस्थिती निर्माण होते. अनेक भागात यामुळे शेतकऱ्यांना व काही ठिकाणी नागरिकांना मोठ्या प्रमाणात नुकसानीला तोंड द्यावे लागते. पूरात भरडल्या जाणाऱ्या लोकांचा रोष हा शासनाला घ्यावा लागतो. वास्तविक ज्या कुणामुळे हे अतिक्रमण महसूल विभागाअंतर्गत असलेल्या नाल्यांवर केले गेले आहे त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. अशा अतिक्रमणाला शासकीय यंत्रणेच्या अंतर्गत असलेले नगरपरिषदा, नगरपंचायती व इतर अधिकाऱ्यांची निष्क्रीयता कारणीभूत ठरते. याबाबत शासनाने गांभिर्याने विचार केला असून येत्या पावसाळ्यात नाल्यांवरील अतिक्रमणांमुळे पूरसदृष्य परिस्थिती उद्भवल्यास संबंधित अधिकाऱ्यांना ही जबाबदार धरले जाईल, असे ते म्हणाले. बहादूरा ते नरसाळा भागात टेक ऑफ सिटी व टेक ऑफ गार्डन मालकाने नैसर्गिक नाल्यावर अतिक्रमण करुन मौजा नरसाळा गारमोटी मनपाच्या हद्दीत अनैसर्गिकरित्या लहान पाईपलाईन मधून हे पाणी वळविल्याने त्या भागात सतत पूराला तोंड द्यावे लागत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली होती.

याबाबत आढावा घेतांना नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, स्थानिक महसूल अधिकारी, विकास प्राधिकरण, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यांनी आपआपल्या भागातील नाल्यांची तपासणी केली पाहिजे. त्यावरील अतिक्रमणे काढून सर्व नाले पोकलेन सारखी यंत्रणा वापरुन स्वच्छ करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यात महसूली नाल्यांचा नैसर्गिक असलेला प्रवाह अतिक्रमण करुन बदलला असेल तर दोषींविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत कारवाईचे निर्देश त्यांनी दिले. संपूर्ण राज्यासाठी याबाबत लवकरच धोरणात्मक निर्णय घेत असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

## वासरांमध्ये होणाऱ्या केस गळतीची कारणे



कधी- कधी वासरांच्या आंगावरील केस गळून जातात. त्यांच्या अंगाला खाज सुटते. वेळेवर निदान न झाल्यामुळे आणि उपचार न केल्यामुळे वासरांच्या त्वचा उघडी पडते. हे कशामुळे होतं हेच काही पशुपालकांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे अशावेळेस लक्षणे ओळखून पशुवैद्यकाचा सल्ला घेऊन उपचार करण्याची गरज असते.

वासरे २ ते १० आठवडे वयाची असताना त्यांच्यात व्हिटॅमिन-सी ची कमतरता आढळून येते. नैसर्गिकरित्या जनावरांच्या पोटात व्हिटॅमिन सी तयार होत असतं पण ते वासरांमध्ये कमी प्रमाणात तयार होते. दुभत्या गायीमध्ये ग्लूकोजचे प्रमाण कमी असल्यानं व्हिटॅमिन सी ची कमतरता आढळून येते. जनावरांना किटोसीस झाल्यावर शरीरातील 'व्हिटॅमिन सी' चे प्रमाण कमी होते. दुभत्या गाईमध्ये व्हिटॅमिन-सी कमी असते. लहान वासरांतील वासरांमधील 'व्हिटॅमिन-सी'च्या कमतरतेची लक्षणे ओळखणे गरजेच आहे. वासरांमध्ये व्हिटॅमिन- सी ची कमतरता निर्माण झाल्यानंतर त्यांचे केस गळून जातात. वासरांच्या त्वचेवर लालसरपणा येतो. खाज न येता केस गळून गेल्याने वासरांची त्वचा उघडी पडते.मांड्यांचे, पायांचे केस पूर्णपणे निघून जातात. कधी कधी वेळीच योग्य उपचार न झाल्यास तोंडाचे व मानेचे केस निघून त्वचा उघडी पडते.

जमिनीत असलेले क्षार, वापरलेली खते आणि पाणी, चाऱ्याचा प्रकार यासारख्या घटकांवरून चाऱ्यातील खनिजांचे प्रमाण ठरत असतं. द्विदल चाऱ्यामध्ये कॅल्शियम चे प्रमाण जास्त असते. जलद गतीने वाढणाऱ्या हिरव्या कोवळ्या चाऱ्यात मॅग्नेशियमचे प्रमाण कमी असते. जसा चारा जुना होत असतो ते त्यातील स्फुरदच प्रमाण कमी कमी होत असते. काही व्हिटामिन नैसर्गिकरीत्या जनावरांच्या शरीरात तयार होत असतात. त्यामुळे जनावरांना सकस चारा खायला देणं अत्यंत गरजेचे आहे. याशिवाय वासरांना डॉक्टरांच्या सल्ल्याने व्हिटॅमिन सी चा पुरवठा करावा.

## केरळ सहकारी दूध संघ २०३० पर्यंत १० हज़ार कोटी रुपयांची उलाढाल करेल :सचालक मणी यांचा दावा

तिरूअनंतपूरम : केरळ सहकारी दूध संघाने २०३० पर्यंत १० हजार कोटी रुपयांचा व्यवसाय करण्याचं लक्ष्य ठेवलं आहे. त्यासाठी दुग्धजन्य पदार्थांच्या निर्यातीसह ग्रामीण बाजारावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात येणार असल्याचं मिल्माचे संचालक के. एस मणी यांनी बिझनेसलाईन या वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखत सांगितलं आहे.

महाराष्ट्रात सहकारी दूध संघ कोलमडत असताना अन्य राज्यातील सहकारी दूध संघांची आर्थिक उलाढालीत वाढ होऊ लागल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे गुजरात, कर्नाटक आणि केरळ या राज्यांचे सहकारी दूध संघ जोरात उभारी घेत असताना महाराष्ट्रातील दूध व्यवसाय का कोलमडत आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दूध आणि दुधावर आधारित १५० हून अधिक रेडी-टू-ईट पदार्थ मिल्मा उत्पादित करतं. त्यातून मागील वर्षभरात ४ हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल झाल्याचं मणी म्हणाले. तसेच निवडक शहरी भागात स्विगी इंस्टामार्ट या ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे थेट ग्राहकांच्या दारापर्यंत उत्पादने पोहोचवण्याची सेवा सुरू केली आहे. तसेच ही सेवा इतर जिल्ह्यांमध्ये वाढवण्यासाठी सामंजस्य करार केल्याचं मणी म्हणाले.

मणी यांनी पुढे दूध उत्पादन, बाजारपेठ आणि वितरणाची साखळी याची माहिती दिली. निर्यात बाजारपेठा आणि प्रमुख महानगरांमधील उत्पादन वितरण नेटवर्क मजबूत करणं, उत्पादनांची विविधता वाढवणं आणि दर्जा व पॅकेजिंग सुनिश्चित करणं या मार्गांनी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व्यवसाय योजना आखली आहे. ग्राहकांचा प्रतिसाद विशेषतः रेडी टू ईट पदार्थांना आहे. परंतु या उत्पादनांसाठी कमी शेल्फ लाईफ गोष्ट अडथळा ठरते. त्यामुळे निर्यातीसाठी जास्त शेल्फ लाईफ असलेली उत्पादनं लवकरच बाजारात आणली जातील, असंही मणी यांनी सांगितलं.मिल्माचे १० लाखांहून अधिक दूध उत्पादक शेतकरी सभासद आहेत. तर ३ हजार ५०० प्राथमिक दूध सहकारी असून मलबार, एर्नाकुलम आणि तिरुवनंतपुरम या प्रादेशिक संघांकडून त्याअंतर्गत वितरण केलं जातं. शेतकऱ्यांना किफायतशीर दर देण्यासाठी योजना मिल्माकडून चालवली जात असल्याचंही मणी म्हणाले.







## लष्करी अळीपासून मका पिकाचे संरक्षण कसे करावे ?

खरिपातील मक्यावरील लष्करी किडीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. लष्करी ळी हा अमेरिकेतील मूळचा विनाशकारी कीटक आहे. या किडीमुळे भारतातील मका पिकाचे खूप आर्थिक नुकसान होत आहे. त्याचे मूळ ठिकाण अमेरिकेच्या दक्षिणेकडील फ्लोरिडा आणि टेक्सासचे प्रदेश मानले जाते. परंतु आतापर्यंत त्याचे दुष्परिणाम भारतासह ७० देशांतील किमान ८० प्रकारची पिके, भाजीपाला, फळे आणि फुलांवर पसरले आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मका रिसर्च लुधियानानेही हानिकारक कीड टाळण्यासाठी काही सूचना दिल्या आहेत.

लष्करी अळी संपूर्ण पीक नष्ट करते

लुधियानाच्या मते, लष्करी अळी मुख्यत्वे मका पिकाचे नुकसान करतात आणि मका नसताना ही कीड ज्वारीच्या पिकावर हल्ला करते. दोन्ही पिके शेतात उपलब्ध नसल्यास ऊस, भात, गहू, नाचणी या पिकांवर परिणाम होतो. त्याचबरोअबर कापूस आणि भाज्यांचे देखील नुकसान होऊ शकते. ही कीड एवढी धोकादायक आहे की जे काही पीक सापडते ते पूर्णपणे नष्ट करते.

लष्करी अळी प्रादुर्भाव कसा ओळखायचा?



लुधियाना येथील तज्ज्ञांच्या मते, लष्करी अळी १०० किलोमीटरपर्यंत उड्डाण करून ते पिकांना खातात.लष्करी अळी नर पतंग शरीराच्या दोन लक्षणांवरून ओळखता येतात. या किडीच्या मागील बाजूस मध्यभागी एक पिवळा डाग असतो आणि समोरच्या पंखावर पांढरा ठिपका असतो. लष्करी अळी ची मादी एकटी तिच्या आयुष्यात १००० पेक्षा जास्त अंडी घालते. त्यामुळे एकदा पिकांना लष्करी अळी लागली तर शेतकऱ्यांसाठी खूप चिंताजनक बाब बनते. लष्करी अळ्या हिरव्या किंवा गुलाबी, तपकिरी असतात.

लष्करी अळीचे नियंत्रण कसे करायचे :

आयआयएमआर लुधियानाने लष्करी अळी नियंत्रणासाठी उपाय सुचवले आहेत. किडीचा हल्ला मक्याची उगवण झाल्यानंतर २-४ आठवड्यांनंतर होतो आणि ५ ते १० टक्के झाडाची लागण होते. सर्वप्रथम बीटेक २ मिली हे औषध प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे. झाडातील नुकसान १० टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास स्पिनटार्म ११.७% प्रति लिटर पाण्यात ०.५ मिली औषध मिसळून फवारणी करावी.

मक्याच्या पिकावर ४ ते ७ आठवड्यांनी उगवण झाल्यानंतर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाल्यास आणि १०-२०% झाडांना प्रादुर्भाव झाला असल्यास, स्पिनेटोरम ११.७% ०.५ मिली प्रति लिटर पाण्यात किंवा क्लोरॉंट्रानिलिप्रोल १८.५ ०.४ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. या किडीमुळे २०% संक्रमित झाडे मक्याची उगवण झाल्यानंतर सात आठवडे आढळल्यास, स्पिनेटोरम ११.७% ०.५ मिली प्रति लिटर पाण्यात किंवा क्लोरॉंट्रानिलीप्रोल १८५ ०.४ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अशाप्रकारे फवारणी केल्यास तुम्ही या अळीवर नियंत्रण मिळवू शकता. यामध्ये महत्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या मका पीकामध्ये अळीचा जास्तच प्रादुर्भाव असेल तर तुम्ही कृषी अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊ शकता.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

५२६ : सिरीया आणि अँटोचियात झालेल्या एका भूकंपात सुमारे ३,००,००० लोकांचा मृत्यू.
१४९८ : पोर्तुगालचा वास्को-द-गामा दोनशे खलाश्यांसह भारतातील कालिकत बंदरामध्ये येऊन पोहचला.
१५४० : छायाचित्रकार अब्राहम ऑरटेलियस यांनी थॅट्रम ऑरबिस टेरारम हा पहिला आधुनिक ॲटलास प्रकाशित केला.
१८७३ : लेव्ही स्ट्रॉस आणि जेकब डेव्हिस यांनी तांब्याची बटणे असलेल्या निळ्या जीन्स चे पेटंट घेतले.
१८९१ : थॉमस एडीसन यांनी किनेटोस्कोप चे पहिला प्रोटोटाइप प्रदर्शित केले
१९०२ : क्यूबा देश अमेरिकेपासून स्वातंत्र्य झाला.
१९४८ : चिआंग काई शेक चीन गणराज्यचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवडून आले.
१९९५ : रशियाने मानव रहित अंतरीक्ष यान 'स्पेक्त्र' च प्रक्षेपण केलं.
१९९६ : देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल माजी केंद्रीय अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांना ऑनेस्ट मॅन ऑफ द'इयर हा पुरस्कार जाहीर.
२००० : राष्ट्रकुल संसदीय संघटनेच्या आशिया विभागाच्या अध्यक्षपदी लोकसभेचे सभापती जी. एम. सी. बालयोगी यांची एकमताने निवड झाली.
२००१ : चित्रपट निर्माते व लेखक अण्णासाहेब देऊळगावकर यांना अखिल भारतीय चित्रपट महामंडळातर्फे चित्रभूषण पुरस्कार जाहीर.
२०१४ : लोकसभा निवडणुकांत बहुमत मिळवून भारतीय जनता पक्ष भारतात सत्तेवर. नरेन्द्र मोदीची पंतप्रधानपदी नेमणूक.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२२ : फ्रेडेरिक पॅसी, नोबेल पारितोषिक विजेता फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ.
१८५० : विष्णुशास्त्री चिपळूणकर, आधुनिक मराठी गद्याचे जनक, ग्रंथकार.
१८५१ : ग्रामोफोन रेकॉर्ड चे शोधक एमिल बर्लिनर यांचा जन्म. (मृत्यू: ३ ऑगस्ट १९२९)
१८६० : एडुआर्ड बुखनेर, नोबेल पारितोषिक विजेता जर्मन रसायनशास्त्रज्ञ.
१८८२ : सिग्रिड उंडसेट, नोबेल पारितोषिक विजेता नॉर्वेजियन लेखिका.
१८८४ : प्राच्यविद्यासंशोधक, भाषाशास्त्रज्ञ व साहित्यसमीक्षक पांडुरंग दामोदर गुणे यांचा जन्म. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९२२)
१९०० : छायावादी विचारधारेतील हिन्दी कवी सुमित्रानंदन पंत यांचा जन्म. (मृत्यू: २८ डिसेंबर १९७७)
१९०६ : सुप्रसिद्ध भारतीय आधुनिक शिल्पकार व चित्रकार रामकिंकर बैज यांचा जन्मदिन.
१९१३ : हेव्हलेट-पॅकार्ड चे सहसंस्थापक विल्यम रेडिंग्टन हेव्हलेट यांचा जन्म. (मृत्यू: १२ जानेवारी २००१)
१९१५ : इस्त्रायलचे परराष्ट्रमंत्री, कृषीमंत्री आणि संरक्षणमंत्री, इस्रायली सेना प्रमुख मोशे दायान यांचा जन्म. (मृत्यू: १६ ऑक्टोबर १९८१)
१९१८ : भारतीय सैन्य दलातील सर्वोच्च सन्मान परमवीर चक्र सन्मानित भारतीय लष्कर दलातील सेवानिवृत्त अधिकारी मेजर पिरुसिंह यांचा जन्मदिन.
१९४४ : रेड बुल चे सहसंस्थापक डीट्रिख मत्थेकित्झ यांचा जन्म.
१९५२ : कॅमेरुनचा फूटबॉलपटू रॉजर मिला यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५७१ : राघवचैतन्यांचे विख्यात शिष्य व संत तुकारामांचे गुरु, केशवचैतन्य ऊर्फ बाबाचैतन्य यांनी जुन्नरजवळील ओतूर येथे समाधी घेतली.
१७६६ : इंदूरच्या राज्याचे संस्थापक, मराठेशाहीतील पराक्रमी सेनापती व मुत्सद्दी मल्हारराव होळकर यांचे निधन. (जन्म: १६ मार्च १६९३)
१८७८ : समाजसुधारक व संस्कृत विद्वान कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे निधन.
१९२९ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील क्रांतिकारक व महात्मा गांधी यांच्या चंपारण सत्याग्रहातील प्रमुख सदस्यांपैकी एक राजकुमार शुक्ल यांचे निधन.
१९३२ : लाल-बाल-पाल या त्रयीतील स्वातंत्र्यसेनानी बिपिन चंद्र पाल यांचे निधन. (जन्म: ७ नोव्हेंबर १८५८)
१९५७ : भारतीय स्वातंत्र्यसेना व राजकारणी तसचं, मद्रास प्रांताचे भूतपूर्व मुख्यमंत्री व आंध्रप्रदेशचे पहिले मुख्यमंत्री तंगुटुरी प्रकाशम पंतुळु यांचे निधन.
१९६१ : कम्युनिस्ट नेते व प्रभावी वक्ते भाई विष्णूपंत चितळे यांचे निधन.
१९९२ : सामाजिक कार्यकर्त्या डॉ. लीला मूळगांवकर यांचे निधन. (जन्म: १० ऑक्टोबर १९१६)
१९९४ : आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री के. ब्रम्हानंद रेड्डी यांचे निधन. (जन्म: २८ जुलै १९०९)
१९९७ : इंडियन एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त, शिक्षणक्षेत्रातील विश्वकर्मा माणिकराव लोटलीकर यांचे निधन.
२०१२ : भारतीय मानववंशशास्त्रज्ञ लीला दुबे यांचे निधन. (जन्म: २७ मार्च १९२३)
२०१२ : रिमोट कंट्रोल चे शोधक यूजीन पॉली यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९१५)
२००० : एस.पी. गोदरेज, भारतीय उद्योगपती

# मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी घेतली अजितदादांची भेट

## शैक्षणिक कर्जासाठी लागणारे जामीनदाराची अट रद्द करण्याची विनंती

## गेल्या सहा महिन्यांच्या कामाचा अहवाल केला सादर

बीड। प्रतिनिधी

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि मागासपण दूर करण्याच्या हेतुने काम करत आहे. परंतु गरजू विद्यार्थ्यांसाठी जी शैक्षणिक कर्ज योजना राबवली जाते त्या योजनेची नियमावली गोरगरीब विद्यार्थ्यांना थेट कर्ज मिळवून देण्यात अडचणीची ठरू पाहात आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या अल्पसंख्यांक समाजाकडे स्थावर मालमत्ता अथवा जंगम मालमत्ता उपलब्ध नसते. परंतु विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज जेव्हा घ्यायचे असते ते व्हा त्यांच्याकडे जामीन देण्यासाठी कुठलीच मालमत्ता नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मिळत नाही. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी या योजनेला लागणारे मालमत्ताधारक व नोकरदार जामीनदार ही अट रद्द करावी, अशा आशयाची मागणी एका निवेदनाद्वारे मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. या वेळी शेख तय्यब यांनी गेल्या सहा महिन्यांच्या आपल्या कामाचा अहवालही उपमुख्यमंत्र्यांना सादर केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार आज बीड जिल्हा दौर्यावर आहेत. परळी येथे कार्यक्रमाच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री अजितदादा हे आले असता मौलाना आझाद आर्थिक विकास महमंडळाचे संचालक शेख



तय्यब यांनी त्यांची भेट घेऊन अल्पसंख्याक समाजातील लोकांच्या अडीअडचणींवर चर्चा केली. या वेळी शेख तय्यब यांनी गेल्या सहा महिन्यांचा आपल्या कामाचा अहवालही उपमुख्यमंत्र्यांना सादर केला. संचालकपदी नियुक्ती झाल्यानंतर शेख तय्यब यांनी राज्यभर दौरा केला होता. जिल्हानिहाय जात तेथील अल्पसंख्याक समाजातील लोकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या भेटीगाठी घेतल्या होत्या. त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या होत्या. तोच अहवाल आज सादर केला. या वेळी दिलेल्या निवेदनात अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात शेख तय्यब यांनी म्हटले,

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत अल्पसंख्यांक समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक, मागासपण दुर करण्याहेतू आजपावेत काम करत आले आहेत. गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत आहे. परंतु या योजनेसाठी जी नियमावली आहे ती अल्पसंख्यांक समाजातील गोर-गरीब, विद्यार्थ्यांसाठी अडचणीची ठरू पाहत आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकडे स्थावर मालमत्ता, जंगल मालमत्ता अथवा अन्य कुठलेही साधन जामीन देण्यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध नाही. परिणामी विद्यार्थ्यांना जेव्हा शैक्षणिक कर्ज घ्याव्याचे असते तेव्हा केवळ जामीन देण्यासाठी त्यांच्याकडे कुठलीच मालमत्ता नसल्याने ते शैक्षणिक कर्जापासून वंचित राहतात. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना ही अल्पसंख्यांक समाजातील गरीबांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दृष्टया मागासपण दुर करण्याच्या उदात हेतुतून झाली आहे. राज्य शासनाने या महामंडळाच्या अंतर्गत अनेक कामे हाती घेतलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देणे होय. केवळ गरीब विद्यार्थ्यांना जामीनीसाठी काही उपलब्ध नाही म्हणून महामंडळाचा आणि विद्यार्थ्यांचा हेतू साध्य होत नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्जाबाबत ज्या काही अटी महामंडळाने आखल्या आहेत. त्या रद्द करून विद्यार्थ्यांच्या सिबीलवर कर्जदारा विद्यार्थ्यांचे नाव टाकण्यात यावे अथवा त्यांच्याकडून लिखित बॉन्ड करून घ्यावा. आत्ताच केंद्र सरकारने नव उद्योग करणार्यांसाठी कर्ज योजना वाढवली आहे. त्यामध्ये नवउद्योग करणार्या उमद्या तरूणाला कर्ज देतांना त्या कर्जाची जिम्मेदारी थेट केंद्रसरकाने घेतली आहे. त्या धर्तीवर अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी कर्ज देतांना महामंडळाला शासन त्यांच्या कर्जाची जबाबदारी घेता येईल का या बाबतही विचार व्हावा विद्यार्थ्यांना कर्ज देतांना जामीनदारांचे जी अट ठेवण्यात आली आहे ती रद्द करण्यात यावी, असे म्हणत महामंडळाने असे क्रांतीकारी निर्णय घेतल्यास अल्पसंख्यांक समाजातील गोर गरीब विद्यार्थ्यांची उन्नतीबरोबर शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक मागासपण दुर होण्यास मदत होईल.

# महिलेकडून चार किलो गांजा जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



जालना। प्रतिनिधी

मानवी आरोग्यास घातक असलेला गांजा विक्री करणाऱ्या महिलेकडून ०४ किलो ५७९ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला सदरील कारवाई जालना स्थानिक गुन्हे शाखेने केली जालना जिल्हयात अवैध गांजा विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याचे मा. पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना अवैध गांजा विक्री करणारे व्यक्तीची माहिती काढून त्यांचेवर कारवाई करण्याच्या सुचना देवुन मार्गदर्शन केले होते.

त्यानुषंगाने दिनांक १६/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती मिळाली की, चंदनझिरा येथील एक महिला लहुजीनगर झोपडपट्टी एकतानगर, चंदनझिरा हि तिच्या राहत्या घरामध्ये मानवी आरोग्यास हानीकारक असलेला गांजाची अवैधगणे स्वत चे आर्थीक फायद्यासाठी विक्री करत असल्याची माहिती मिळाली, मिळाले बातगीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी लहुजीनगर झोपडपट्टी एकतानगर, चंदनडिझरा येथील महिला वय ३०, रा लहुजीनगर झोपडपट्टी एकतानगर, चंदनझिरा घरी छापा मारुन तिच्या ताब्यातुन एकूण ४ किलो ५७९ ग्रॅम बजनाचा गांजा रु.९१,५८०/- किंगतीचा गाल जप्त केला असून सदर महिला विरुद्ध चंदनहिरा पोलीस ठाणे येथे एन.डी.पी.एस. कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा जश, सहा. पोलीस निरीक्षक श्री योगेश उबाळे, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, संभाजी तनपुरे, गोपाल गोशिक, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, कैलास खाडे, रस्तुम जैवाळ, प्रशांत लोखंडे, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, रमेश काळे, भागवत खरात, धीरज भोसले, सचिन राऊत, गणेश वाघ मपोअ/ कविता काकस, सत्यभामा उबाळे सर्व स्थागुशा यांनी केली आहे.

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या संस्कृत विभागाचे बारावी बोर्ड परीक्षेत उत्तुंग यश

माजलगाव। प्रतिनिधी

येथील भा शि प्र संस्था संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाने प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षी बारावी बोर्ड परीक्षेत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या संस्कृत विभागाने उत्तुंग यश मिळताना १०० टक्के निकालासह तसेच संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण घेणारे ३५ विद्यार्थी आहेत.तसेच ९९ गुण प्राप्त करणारे १० विद्यार्थी व ९८ गुण घेणारे १० विद्यार्थी आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना ज्येष्ठ प्राध्यापक लक्ष्मीकांत सोन्नर आणि प्रा.सुरेशचंद्र नेळगे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी गुणवंत व उत्तीर्ण विद्यार्थ्याचे भा शि प्र संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलूरकर, उपाध्यक्ष सौ. ज्योती ताई ठाकूर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व श्री सिद्धेश्वर संकुलांचे पालक प्रकाश




दुगड, केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी,कार्यवाह विश्वासराव जोशी,महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य प्रा अंकुश साबळे, डॉ गजानन होन्ना, डॉ युवराज मुळ्ये,पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक विजय कुलकर्णी यांचेसह सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# माजलगाव पंचायत समितीकडून होणारी लूट थांबवा -ॲड.नारायण गोले

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील विविध योजना बाबत पंचायत समिती कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी गांभीर्यपूर्वक काम करायला धजत नसून शेतकरी व सर्वसामान्यांची पैशाअभावी अडवणूक केली जात असून घरकुल योजना,रोजगार हमी योजनेतील विहिरीच्या कामासाठी ग्रामसेवक, इंजिनियर व पंचायत समितीतील अधिकारी, कर्मचारी, रोजगार सेवक यांचे दर निश्चित झाले असून छत्रबोरगाव येथील अभियंता जायभाये हे तर घरकुलासाठी सरसकट व सक्तीचे एक हजार रुपये घेत असल्याची तक्रार गट विकास अधिकारी यांना देऊन त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

माजलगाव शहरातील कृषी सेवा केंद्रांना पंचायत समितीतील कृषी अधिकारी गटपाळे हे पाठीशी घालत असून कृषी सेवा केंद्राच्या संचालकाकडून शेतकऱ्यांना खते नसल्याबाबत सांगून अडवणूक करून त्यांची आर्थिक



पिळवणूक केली जात असल्या बाबतची तक्रार केली व पंचायत समिती कार्यालयातील भ्रष्टाचाराच्या दरपत्रकाची यादी गटविकास अधिकारी श्री डोंगरे यांना दाखवून त्याबाबत भ्रष्ट अधिकारी यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करुन तात्काळ लूट थांबवण्याची मागणी केली, परंतु गट विकास अधिकारी यांनी स्पष्ट भूमिका न घेतल्यामुळे संतृप्त शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समितीच्या मुख्य द्वारावर रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचाराचे दर डकवुन पंचायत समिती प्रशासना विरोधात बोंबा मारत निषेध केला.या वेळी शेतकरी कामगार पक्षाचे भाई ॲड.नारायण गोले पाटील,भाई मुंजा पांचाळ, भाई श्रीराम शेवाळे, जयराम राऊत,करण थोरात, परमेश्वर डाके आदींची उपस्थिती होती

# वडमाऊली दहिफळ येथे मोफत मुलांचे बाल संस्कार शिबिर

बीड। प्रतिनिधी

केज तालुक्यातील दहिफळ माऊली येथे शिवप्रतिष्ठान वारकरी शिक्षण संस्था चे संचालक ह.भ प बसवर महाराज यांच्या मार्गदर्शनाने व कुशल नियोजनाने दिनांक २० मे ते २ जून पर्यंत मुलांचे भव्य दिव्य बालसंस्कार शिबिर सुरू होणार आहे. हे शिबिर सर्वांसाठी मोफत आहे या शिबिरात मुलांना वारकरी भजन,किर्तन, भा. ज्ञानेश्वरी प्रवचन, भागवत कथा,रामायण, तुकाराम गाथा भजन, हरिपाठ, तबला वादन,गायन, हार्मोनियम वादन तसेच मूल्य शिक्षण योग याबरोबरच संगीत आणि विविध कलात्मक गोष्टी शिकवण्यात येणार आहेत .या शिबिरामध्ये मुलांना नाश्ता , दोन वेळा जेवण, फिल्टरचे पिण्याचे पाणी असणार आहे. तरी जास्तीत जास्त पालकांनी आपल्या मुला मुलींना प्रवेश देऊन या शिबिराचा लाभ घ्यावा असे शिवप्रतिष्ठांची हभप बसवर महाराज यांनी कळवले आहे

# माजलगावात सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसट यांच्या नागरी सत्काराचे आयोजन

## स्वागताध्यक्ष उपसभापती श्रीहरी मोरे,सचिन डोंगरे यांची माहिती

माजलगाव। प्रतिनिधी

राज्याच्या सामाजिक न्याय मंत्रीपदी तथा छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्री पदीनिवड झाल्याबद्दल ना. संजय सिरसट यांच्या नागरी सत्काराचे आयोजन माजलगाव येथे दि. २४ मे शनिवार रोजी बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती स्वागताध्यक्ष तथा बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे,सचिन डोंगरे यांनी दिली आहे. शहरातील जुना मोंढा येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास बहुजन नेते बाबुराव पोटभरे,आमदार धनंजय मुंडे, आमदार प्रकाश सोळंके,आमदार सुरेश धस,आमदार विजयसिंह पंडित, आमदार नमिता मुंदडा,शिवसेनेच्या युवा नेत्या हर्षदा सिरसट यांची उपस्थिती असणार आहे.कार्यक्रमाचे निमंत्रण ना.



संजय शिरसट यांना देत उपसभापती श्रीहरी मोरे,नवनाथ धाईजे,भीमराव टाकणखार यांनी त्यांचा सत्कार केला.याच कार्यक्रमात दुपारी चार वाजता गायनाचा कार्यक्रम पेढे तुला व नागरी सत्कार असा भव्य दिव्य कार्यक्रम होणार असून कार्यक्रमास उपस्थित रहा असे आवाहन राजेश साळवे,प्रशांत ससाने,शहराध्यक्ष राहुल मस्के, अशोक लांडगे, प्रदीप पट्टेकर, वसंत वाव्हळकर, बाबा शेख, फेरोज शेख, विजय धाईजे, विनोद शिंदे, अभिजीत पोटभरे, अक्षय मोरे,सदानंद प्रधान, बाबा वाघमारे, नितिन काळे, किरण खळगे, विजय साळवे, धर्मा मोरे, आकाश माने, दीपक टाकणखार, जयदीप तांगडे, विठ्ठल पंडित, लखन हजारे यांनी केले आहे.

# कुठलाच पात्र लाभार्थी घरकुल सर्व्हेपासून वंचित राहू नये

## प्रशासनाला खबरदारी घेण्याच्या आ.संदीप क्षीरसागरांकडून सूचना

बीड। प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या सेल्फ सर्व्हे ला ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ मिळालेली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक लाभार्थ्यांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचण येत आहे. त्यामुळे कुठलाही लाभार्थी सर्व्हेपासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाने सर्व ग्रामसेवकांना कडक सूचना द्याव्यात, असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिले आहेत.



ग्रामीण भागातील पात्र नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मोबाइलद्वारे सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. तांत्रिक अडचणींमुळे आणि विलंबामुळे कोणताही पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नये याकरिता सेल्फ सर्व्हे करण्यासाठी प्रशासनाकडून मुदतवाढही देण्यात आली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक पात्र लाभार्थी हे अशिक्षित आहेत तसेच अनेकांकडे स्मार्टफोन नाहीत, आणि अनेकांना तांत्रिक माहिती नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचणी येत आहेत. या बाबींचा विचार करून गावपातळीवर, ज्या पात्र लाभार्थींना सेल्फ सर्व्हेबाबत अडचणी आहेत त्या लाभार्थींचा सर्व्हे ग्रामसेवकांनी करून द्यावा. एकही पात्र लाभार्थी सेल्फ सर्व्हेपासून वंचित राहू नये याची खबरदारी घेण्याचे कडक निर्देश ग्रामसेवकांना द्यावेत. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक, गटविकास अधिकारी बीड व शिरूर (का.) यांना दिल्या आहेत.

# मुख्याधिकारी चव्हाण यांच्या भ्रष्ट कारभाराची पोलखोल करणारी त्रीसदस्यी समिती पुनर्गठीत करा

## सय्यद सलीमबापू यांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

माजलगाव। प्रतिनिधी

येथील नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्या भ्रष्ट कारभाराची पोलखोल करणारी त्रीसदस्यी समिती पुनर्गठीत करा.व चव्हाण यांना पाठीशी घालणाऱ्या एसडीओ माजलगाव यांचीही चौकशी करा.नसता गुरुवार दि.२२ मे रोजी जिल्हाधिकारी बीड यांच्या कार्यालयया समोर उपोषण करण्याचा इशारा सय्यद सलीमबापू यांनी दिला आहे. आंबेडकरी विचार मोर्च्याचे जिल्हाध्यक्ष एड.ए.एन.सय्यद यांनी दि.२७ जुन २०२४ रोजी माजलगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व इंजिनीयर तसेच गुत्तेदार यांनी संगनमत करुन २ वर्षात कोट्यावधी रुपयांचे सिमेट रस्ते,नाली,घनकचरा, नगर परिषद फंड,गुंठेवारी व रजिस्ट्री ऑफीसची १ टक्के रक्कम तसेच ओपन स्पेसची जागा,डीपी रोड या कामामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे.व या सर्व प्रकाराचे मुख्य सूत्रधार मुख्याधिकारी प्रशासक चंद्रकांत चव्हाण आहेत.यावर तात्काळ त्रीसदस्यी समिती गठीत करुन इंस्टिमेट प्रमाणे काम न झाल्यामुळे कॉलेटीकंट्रोल द्वारे गुणवत्तेनुसार चौकशी करावी.



तसेच एकच रस्ता दहावेळा करण्यात आला याची देखील चौकशी करावी.असी तक्रार तत्कालीन जिल्हाधिकारी मुधोळ मॅडम यांना दिली होती. त्यानुसार मुधोळ मॅडम यांनी ५ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्याधिकारी चव्हाण यांचेविरुध्द त्रीस्तरीय समिती घटीत केली होती.या समितीमध्ये समितीचे अध्यक्ष म्हणुन उपविभागीय अधिकारी माजलगाव.सदस्य कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई.दुसरे सदस्य व लेखाधिकारी,अंतर्गत लेखापरिक्षण जिल्हाधिकारी बीड यांना सदस्य सचिव म्हणुन नेमणुक केली होती.तसे आदेश जिल्हा सहआयुक्त व जिल्हाधिकारी बीड यांनी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना पत्र काढले.परंतु पत्र काढून देखील अधिपविभागीय अधिकारी माजलगाव यांनी अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही अथवा समितीची चौकशी केली नाही. त्यामुळे माजलगाव नगरपरिषदेतील भ्रष्टाचाराचा कळस सतत वाढत राहिला आहे.तसेच नगरपरिषदेच्या भ्रष्टाचाराचे जनक चंद्रकांत चव्हाण यांच्या भ्रष्ट कारभारावर उपविभागीय अधिकारी माजलगाव यांनी पडदा टाकला.त्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी मुधोळ मॅडम यांनी चंद्रकांत चव्हाण यांच्या भ्रष्ट कारभाराची पोलखोल करणारी त्रीसदस्यी समिती पुनर्गठीत करावी.व चव्हाण यांना पाठीशी घालणाऱ्या उपविभागीय अधिकाराच्या कारभाराचीही चौकशी करावी.नसता गुरुवार दि.२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे उपोषण करणार असल्याचा इशारा समाजसेवक सय्यद सलीमबापू यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.या निवेदनावर आंबेडकरी विचार मोर्च्याचे जिल्हाध्यक्ष एड.ए.एन. सय्यद यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# नाथपंथी समाजातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



बीड । प्रतिनिधी

नाथपंथी समाज बांधव यांनी काल दिनांक १८/५/२५ रविवारी दुपारी १० वी व १२वी मध्ये उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा काल हॉटेल साईप्रसाद माने कॉम्प्लेक्स जवळ या ठिकाणी मोठ्या थाटात संपन्न झाला .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा नेते डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्री श्री १००८ शिवरुद्र आनंद स्वामी सरस्वती काशी विश्वेश्वर मठ हे होते . प्रमुख उपस्थिती भरत महाराज जोगी परळी व भरत महाराज बुधोडा , बालकनाथ यादव , भरत नाना चव्हाण यांची होती. या कार्यक्रमात अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ , नाथ मुद्रा प्रतिष्ठान व नातमुद्रा बचत गट बीड यांनी विद्यार्थ्याबरोबरच काही व्यक्तींना उत्कृष्ट कामगिरीबद्दल समाजभूषण पुरस्कारही वितरित करण्यात आला या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील दहावी व बारावी मधील उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आवश्यक सुविधा निर्मितीला प्राधान्य- उपमुख्यमंत्री अजित पवार

## आवश्यक मनुष्यबळ, पायभूत सुविधांसाठी लवकरच वैद्यकीय शिक्षण विभाग आणि वित्त विभागाची संयुक्त बैठक घेणार

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

**अंबाजोगाई, दि. १९ : येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हे ग्रामीण भागात तालुक्याच्या ठिकाणी असलेले एक महत्वाची आरोग्य संस्था आहे. या संस्थेला ५० वर्षे पूर्ण होत असून याठिकाणी नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, पायाभूत सुविधा निर्मितीसाठी निधी दिला जाईल. या निधीतून प्राधान्यक्रम निश्चित करून आवश्यक सुविधा निर्मिती करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज येथे दिले.**

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आयोजित आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री श्री. पवार बोलत होते. पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार बजरंग सोनवणे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंडे, आमदार नमिता मुंदडा, माजी आमदार संजय दौंड, अक्षय मुंदडा, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, आरोग्य सहसंचालक डॉ. शिल्पा दमकुंडवार, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बी. एम. थोरात यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पदवीपूर्व विद्यार्थी



क्षमता १५० इतकी असून या प्रवेश क्षमतेसाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) निश्चित केलेल्या नियमानुसार आवश्यक पायाभूत सुविधा, मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच वैद्यकीय शिक्षण विभाग आणि वित्त विभागाच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात येईल. तसेच आवश्यक कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. या निधीतून करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार आराखडा तयार करावा. पायभूत सुविधांची निर्मिती करताना उपलब्ध जागेचा पुरेपूर आणि योग्य वापर होण्यासाठी तज्ज्ञ आर्किटेक्टची नेमणूक करावी. महाविद्यालयाच्या जमिनीवर झालेले अतिक्रमण हटवावे, तसेच पुन्हा अतिक्रमण होवू नये, यासाठी संपूर्ण परिसराला सुरक्षा भिंत बांधण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या. ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा अत्यावश्यक आणि दर्जेदार कामासाठी विनियोग करावा. औषधांच्या बाबतीत कोणत्याही तक्रारी येवू नयेत, याची काळजी घ्यावी. सध्या सुरू असलेली बाह्यरुग्ण विभाग, मुलांचे वसतिगृह आणि मुलींच्या वसतिगृहाचे काम उच्च दर्जाचे होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक खबरदारी घ्यावी, असे उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या शंभर एकर क्षेत्रामध्ये मोकळ्या जागेत वृक्ष लागवड करावी, तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारावे. महाविद्यालय व रुग्णालयात, तसेच अधिकारी, कर्मचारी निवासस्थाने, वसतिगृहातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी वृक्ष लागवडीसाठी वापरावे. भौगोलिक परिस्थितीचा विचार करून परिसरात रुग्णांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी प्रारंभी महाविद्यालय व रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सुविधा, तसेच नव्याने आवश्यक सुविधांची माहिती दिली. उपस्थित लोकप्रतिनिधींनी यावेळी आपल्या सूचना मांडल्या.

# राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याची दुरुस्ती करा- काँग्रेसची मागणी

## पावसाळ्यापूर्वी रस्ता दुरुस्त न केल्यास आंदोलन करणार-होके पाटील

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शहरातुन गेलेला खामगाव पंढरपूर हा पालखी महामार्ग वारकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेल्या या रस्त्यावर माजलगाव ते तेलगाव दरम्यान अनेक ठिकाणी भेगा पडून रस्ता फाटला असल्याने आपघाताचे प्रमाण वाढले आहे.** त्यामुळे या महामार्गावरील रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी अशी मागणी

काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष नारायण होके पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन केली. पुढे दिलेल्या निवेदनात ते म्हणाले सदरील रस्त्यावर



मोठ्या प्रमाणावर वाहतूक असून रस्त्यावर मोठ मोठ्या भेगा पडल्यामुळे दुचाकीस्वारांना आपला जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे तर. पावसाळ्यात या पडलेल्या भेगामध्ये पाणी साचल्यास मोठ्या प्रमाणात अपघात होऊन निष्पाप नागरिकांना गंभीर दुखापत किंवा जीव देखील गमवावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पालखी महामार्गावरील माजलगाव ते तेलगाव दरम्यानचा रस्ता पावसाळ्यापूर्वी डागडुजी करून वाहन चालकांना भयमुक्त प्रवास करण्यास मदत करावी व अपघात टाळाण्याचे काम करावे. नसता लोकहिताचे या प्रश्नावर काँग्रेस पक्षाच्या वतीने मोठं आंदोलन करण्याचा इशारा तालुका अध्यक्ष नारायण होके पाटील शहराध्यक्ष अफरोज तांबोळी दत्ता कांबळे ऍड इनामदार विनोद सुरवसे शेख जानुशा शेख अहेमद कृष्णा शिंदे विठ्ठल कांबळे बिभीषण साबळे संदिप भरडकर यांच्या सह कार्यकर्त्यांनी दिला. एक वर्षापूर्वी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून आ.प्रकाश सोळंके यांनी सत्तेत असूनही.रस्ता दुरुस्तीसाठी आंदोलनाचा दिखावा केला.परंतु आता परत हा रस्ता जैसे थै अवस्थेत असताना आ.सोळंके मात्र यावर चकार शब्द बोलत नाहीत.



**मराठी पत्रकार परिषदेच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर स्मृतिभवानात झालेल्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये बीड जिल्हा अध्यक्षपदी पुनर्नियुक्ती झाल्याबद्दल बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर, विश्वस्त किरण नाईक सर विश्वस्त शरद पाबळे सर ,माजी अध्यक्ष गजानन नाईक सर ,डिजिटल मीडियाचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, परिषदेचे राज्याचे अध्यक्ष मिलिंद आस्टीवकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, कोषाध्यक्ष मन्सूर भाई शेख, संभाजीनगर विभागाचे सचिव रवी उबाळे , समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष आदींची उपस्थिती होती**

# आता मनसे राबवणार रोषणपुरी ते छोटेवाडी रस्त्याचे मजबुतीकरण होईपर्यंत उपोषण मोहीम -धोंडीराम जाधव

माजलगाव । प्रतिनिधी

काल दि १९ रोजी मनसे ने दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, दि.३०ऑगस्ट २०२४ रोजी नॅशनल हायवे रोषणपुरी फाटा या ठिकाणी या रस्त्या संदर्भात रस्ता रोको आंदोलन करण्यात आलेले होते. त्यावेळी त्यांनी संबंधित कार्यालयाने लेखी आश्वासन दिले होते की, पाऊस संपताच आम्ही या रस्त्याचे मजबुतीकरण करुन देऊत.मात्र या गोष्टी चा संमधीत विभागाला पुर्णतः विसर पडला आहे त्यांनी

आजतागायत त्या रस्त्यावर कुठल्याही प्रकारचे काम केलेले नाही. पाऊस पडल्यानंतर त्या रस्त्याने जाता येत नाही व शेतीची मशागत करता येत नाही. (शेतकऱ्यांना वाहने नेता येत नाहीत. बैलगाडीपण जात नाही. खत, बियाणे नेता येत जलगाव एवढेच नाही तर पायी पण त्या रस्त्याने जाता येत नाही. आशी आवस्था त्या म.म ज. याची होते. यासाठी आम्ही संबंधित कार्यालयात कळविलेले आहे व आंदोलनही केलेले आहे. तरी या





रस्त्याकडे दुर्लक्ष होत आसल्यामुळे सर्व शेतकऱ्यासह महाराष्ट्र नवनिर्माण सेनचे महाराष्ट्र सैनिक हे दि.२३ मे २०२५ रोजी बुवाजीबुवा महाराज यांच्या पादुका या ठिकाणी मनसे स्टाईल उपोषण करणार आहोत. तरी यात काही अनुचित प्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यालयावर राहील.असे दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे निवेदना वर धोंडीराम जाधव ,गणेश वाघमारे ,आत्माराम ढिसळे,पांडुरंग जाधव,कैलास जाधव ,नितीन गावडे ,अशोक आगे आदी सह सुमारे पन्नास ते साठ जणांच्या साह्या आहेत.

# दुहेरी हत्याकांडातील आरोपीला ठोकल्या बेड्या

## पोलिसांना गुंगारा देत चार महिन्यांपासून होता फरार

म्हसोबावाडी । प्रतिनिधी


जुन्या वादातून दोघा भावांची हत्या केल्याची घटना १७जानेवारी रोजी ०० अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील वाहिरा येथे घडली होती. याच गुन्ह्यातील चार महिन्यांपासून अंभोरा पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपी गोरख नारायण भोसले याला शनिवारी अहिल्यानगर येथून अंभोरा पोलिसांनी ताब्यात घेत बेडचा ठोकल्या. या गुन्ह्यातील भोसले टोळीवर मकोका गुन्हा दाखल आहे.

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील वाहिरा येथे १७ जानेवारी गेली गनी गोल्या मेशील तीन सख्ख्या भावांवर दहा लोकांनी हल्ला केला होता. या हल्ल्यात आजिनाथ भोसले, भरत भोसले या दोन भावांचा जागीच मृत्यू झाला होता तर कृष्णा भोसले गंभीर जखमी झाला होता. यानंतर पोलिस अधीक्षकांनी या टोळीवर मकोका गुन्हा दाखल केला होता. हत्या केल्यापासून गोरख भोसले गुंगारा देत फरार होता. अंभोरा पोलिसांनी त्याला शनिवारी रात्री अहिल्यानगर येथून अटक केली. ही कामगिरी पोलिस



अधीक्षक नवनीत कॉवत, अतिरिक्त पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हनपुडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे, पोलिस उपनिरीक्षक नामदेव सातव, पो. ह. बाबूराव तांदळे, पो.अं. शिवदास केदार, राजकुमार आघाव, सतीश पैठणे, चालक या कल्हेरे गांनी केली.

# गार्गी अवसरे ९५.६०% घेऊन ३ तालुक्यातून पहिला नंबर मिळविला



पाटोदा । प्रतिनिधी

जामखेड येथील सीबीएससी बोर्ड मान्यताप्राप्त कालिका पोद्दार लर्न स्कूलमध्ये यावर्षी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी बोर्ड परिक्षेमध्ये उत्कृष्ठ निकालाची परंपरा सलग दुसऱ्या वर्षीही कायम ठेवली आहे.. या विद्यार्थ्यांमध्ये कु. गार्गी अवसरे ९५.६०% प्रथम ,चि. श्रेयश राख ९४.४०% द्वितीय, तर चि. लाभेश चोपडा ९४.२०% तृतीय क्रमांक व एकूण ५८ विद्यार्थ्यांपैकी ३१ विद्यार्थ्यांनी ८०% चा वर गुण मिळवून उत्तीर्ण होऊन शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा लावला आहे.

याही वर्षी शाळेचे व्यवस्थापक या समवेत शाळेचे प्रिन्सिपल सर व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सखोल मार्गदर्शनामुळे हे यश सहज शक्य झाले असे सूर सर्व विद्यार्थी व पालकांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे तसेच या यशाचे परिसरामध्ये सर्वत्र कौतुक देखील केले जात आहे.

# राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची राजकिशोर मोदी यांच्या घरी सदिच्छा भेट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मा ना अजितदादा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी सोमवार दि १९ रोजी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत आमदार धनंजय मुंडे, आमदार विक्रम काळे, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, प्रा. नानासाहेब गाठाळ, केजच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड, हारुन इनामदार, ऍड विष्णुपंत सोळंके, प्रा माणिकराव लोमटे, सतीश नाना लोमटे, मनोज लखेरा, संकेत मोदी, सुरेश मोदी, किशोर



**बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारल्यानंतर अंबाजोगाई शहरात दादांची पहिलीच भेट**

परदेशी , बबन लोमटे सुनील वाघाळकर, महादेव आदमाणे, अमोल लोमटे, दिनेश भराडीया, यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारल्यापासून अजितदादा यांचे अंबाजोगाई शहरात प्रथमच आगमन होत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचे भव्य असे स्वागत करण्यात आले. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख म्हणून राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी देखील ही त्यांची पहिलीच भेट असल्याने मोदी परिवाराच्या वतीने देखील उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे उत्स्फूर्त असे स्वागत करण्यात आले.

यावेळी अजितदादा पवार यांनी आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकिसाठी संपूर्ण ताकदीने निवडणुकीच्या तयारीला लागण्याच्या सूचना केल्या. अंबाजोगाई शहरातील नगर परिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे जास्तीत जास्त नगरसेवक कसे निवडणूक आणता येतील यासाठी प्रयत्न करण्याचे यावेळी आवाहन केले. ◀◀ पान ३ वर

# हुमणी नियंत्रणासाठी सामूहिक मोहीम राबवा -शिवप्रसाद येळकर

## सुर्डी फाटा येथे एकात्मिक ऊस व्यवस्थापन व खरीप नियोजन कार्यशाळा

अंबाजोगाई प्रतिनिधी

कृषी विभाग, नॅचरल शुगर रांजनी व स्पिक कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने सुर्डी, मांग वडगाव, माळेगाव, सोनेसांगवी या गावातील शेतकऱ्यांची सुर्डी फाटा येथे कार्यशाळा आयोजित करून सदर कार्यशाळेमध्ये खरीप हंगामाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात आले. कृषी सहाय्यक कमलाकर राऊत यांनी सोयाबीन पिकाचे विविध वाण, रासायनिक व जैविक बीज प्रक्रिये बाबत मार्गदर्शन केले. मंडळ कृषी अधिकारी दरेकर यांनी बियाणे उगवण क्षमता बाबत माहिती दिली, आत्माचे बीटीएम योगेश पाटील यांनी सोयाबीन कीड रोग व्यवस्थापन बाबत मार्गदर्शन केले. ऊस



विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी हुमणी अळीचा जीवनक्रम समजावून सांगून या अळीमुळे होणारे नुकसान बाबत माहिती दिली तसेच मे महिन्यात अवकाळी पाऊस पडल्यामुळे कडुलिंबाच्या झाडांवर हुमणी अळीचे प्रौढ निदर्शनास येत असल्याने हुमणी अळी प्रतिबंधात्मक व्यवस्थापनासाठी प्रकाश सापळे, एरंड सापळे, कामगंध सापळे लावणे तसेच सोयाबीन पिकामधील पिवळा मोझॅक विषाणू आणि सूक्ष्म अन्नद्रव्य कमतरतेमुळे निर्माण होणारा पिवळसरपणा यामधील फरक आणि याचे व्यवस्थापन तसेच ऊस पिकामधील चाबुक काणी, गवताळ वाढ रोग आणि पोंगेमर, लोकरी मावा, पिठ्या ढेकूण व्यवस्थापन संदर्भात विस्तृतपणे मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे बेड तयार करून टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड करणे आणि शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब करणे संदर्भात माहिती दिली. यावेळी पत्रकार बळीराम लोकरे, कृषी पर्यवेक्षक नागेश येवले, वैभव भिसे, किशोर फरकांडे, प्रगतिशील शेतकरी बब्रुवान कणसे, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार, दि.२० मे २०२५ । पान ७

# शरद पवार पुन्हा मैदानात;

## महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तीन दिवस मॅरेथॉन बैठका

**पुणे । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहेत. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष आगामी निवडणुकांच्या तयारीला लागले आहेत. काही राजकीय पक्षांमध्ये संघटनात्मक बदल होताना पाहायला मिळत आहेत. तर काही बैठका घेऊन आगामी निवडणुकीसाठीची रणनीती आखत आहेत.आगामी महापालिका निवडणुकीच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार देखील आता मैदानात उतरले असल्याचे पाहायला मिळत आहे. शरद पवार यांच्या उपस्थितीत मुंबईमध्ये पक्षाच्या मॅरेथॉन बैठका होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने येत्या २६, २७ आणि २८ मे रोजी सलग तीन दिवस महत्वाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठका मुंबईत होणार आहेत. येत्या महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आणि पक्षातील



वरिष्ठ नेत्यांच्या सल्लामसलतीसाठी या बैठका घेण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे.

या बैठकांचा मूळ उद्देश आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर केंद्रीत असणार आहे. मुंबईसह पुणे, नाशिक, ठाणे आणि इतर प्रमुख शहरांतील महापालिका निवडणुकांमध्ये पक्षाची भूमिका आणि उमेदवारी ठरवण्यासाठी हा महत्वाचा टप्पा ठरणार आहे.

सध्या पक्षामध्ये दोन प्रवाह पाहायला मिळत आहेत. एकीकडे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्रित येऊन लढाव्यात असं काही नेत्यांकडून मत व्यक्त करण्यात येत आहेत तर दुसरीकडे अजित पवारांच्या राष्ट्रवादीवर बरोबर जाणं योग्य नसल्याचं काही नेत्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे या दोन्ही बाजू शरद पवार ऐकून घेणार असल्याचं बोललं जात आहे. २८ मे रोजी होणाऱ्या बैठकीला पक्षप्रमुख शरद पवार स्वतः उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे या दिवशी होणाऱ्या चर्चेला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. विशेषतः दोन राष्ट्रवादी काँग्रेस गट अजित पवार गट आणि शरद पवार गट पुन्हा एकत्र येऊ शकतात का, यावरही या बैठकीत अनौपचारिकरीत्या चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर, शरद पवार यांच्या उपस्थितीमुळे २८ तारखेला होणारी बैठक निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. पक्षाच्या भविष्यातील दिशा आणि निवडणूक रणनिती यासाठी ही बैठक अत्यंत महत्वाची मानली जात आहे.

# वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण!

## महिला आयोगाच्या अध्यक्षा स्वपक्षीयांवर कारवाई करणार का? की 'आपलाच 'म्हणून डोळेझाक करणार? रोहिणी खडसेंचा चाकणकरांना सवाल

**जळगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवी शशांक हगवणे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. ही घटना शुक्रवारी दुपारी पाचच्या सुमारास घडली आहे. बावधन पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी राजेंद्र हगवणे यांच्यासह मुलगा शशांक हागवणे आणि इतर तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना मुळशीतील भुकूम येथे घडली आहे. याच मुद्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकरांवर टीका केली आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षांना वेळ मिळाला तर या प्रकरणाचा तपास करून स्वपक्षीयांवर कारवाई करणार का ? असा सवाल खडसेंनी केला आहे.

पुण्यातील बावधन येथे वैष्णवी हागवणे या महिलेने आत्महत्या केली आहे. वैष्णवी या अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस



पक्षाचे नेते राजेंद्र हागवणे यांची सून होत्या.

वैष्णवी यांच्या पतीने त्यांच्या चारित्र्यावर संशय घेतला होता, तसेच त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला हुंड्यासाठी त्रास दिला जात होता, असा आरोप वैष्णवी यांच्या वडिलांनी केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत्यूनंतर वैष्णवी यांच्या शरीरावर अनेक ठिकाणी जखमांच्या खुणा आढळून आल्या. महिला आयोगाच्या अध्यक्षांना वेळ मिळाला तर या प्रकरणाचा तपास करून स्वपक्षीयांवर कारवाई करणार का ? की 'आपलाच' म्हणून या गंभीर प्रकरणाकडे ही डोळेझाक करणार ?

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा पुण्यातील पदाधिकारी राजेंद्र हगवणे यांच्या सूनेच्या आत्महत्या प्रकरणात तिघांना अटक करण्यात आली आहे. राजेंद्र हगवणे यांच्या पत्नी, मुलगा आणि मुलगी यांना या प्रकरणात अटक केली आहे. तर राजेंद्र हगवणे आणि त्यांचा दुसरा मुलगा फरार आहे. वैष्णवी हवगणे यांनी १६ मे रोजी आत्महत्या केली आहे. जमीन खरेदीसाठी विवाहितेचा शारीरिक आणि मानसिक छळ करून तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी वैष्णवी हगवणे याचे पती, सासू आणि नणंद यांना अटक करण्यात आली आहे. या तिघांना २१ मे पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

वैष्णवी हगवणे यांचा पती शशांक, सासू लता, नणंद करिष्मा अशी पोलीस कोठडीत रवानगी केलेल्यांची नावे आहेत. सासरा राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे हे पसार आहेत. राजेंद्र हगवणे राष्ट्रवादी अजित पवार गटाचा राज्य कार्यकारिणी सदस्य आहे. वैष्णवी हगवणेचे वडील आनंद कस्पटे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार वैष्णवी हिचा पती, सासू-सासरे नणंद आणि दीर यांनी हुंड्यासाठी मानसिक, शारीरिक छळ करून वैष्णवीला क्रूर वागणूक दिली. तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरले. तिच्या अंगावर मारहाणीचे व्रण आढळून आले. या प्रकरणात सध्या हुंडाबळी आणि मृत्यूस कारणीभूत या कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. व्हिसेरा राखून ठेवला असून तपासात काही निष्पन्न झाल्यास त्यानुसार कलमवाढ करण्यात येईल अशी माहिती बावधन पोलिसांनी दिली.

# वारकऱ्यांच्या सेवेसाठी पालखी मार्ग सुसज्ज ठेवा; आयुक्तांनी केली पालखी मार्गाची पाहणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुढच्या महिन्यात पुणे शहरात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगत्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे आगमन होऊन त्यांचा शहरात मुक्काम असणार आहे. या दोन्ही संतांच्या पालखी मार्गावरील सोई सुविधा, स्वच्छता, रस्ता, सुरक्षेच्या दृष्टीने महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी पाहणी केली.





आपत्ती व्यवस्थापन कक्ष सज्ज ठेवणे, रस्त्यावरील अतिक्रमणे, बेवारस वाहने काढणे, ठिकठिकाणी स्वच्छतागृहाची व्यवस्था करणे, पाणी पुरवठा, विद्युत, आरोग्य सुविधा देण्याचे आदेश भोसले यांनी प्रशासनाला दिले आहेत. येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रीय कार्यालय, औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालय, भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय या ठिकाणी सुसज्ज आपत्ती व्यवस्थापन कक्ष उभारण्यात येणार आहे.

अतिरिक्त पृथ्वीराज बी.पी., ओमप्रकाश दिवटे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर, प्रकल्प विभागाचे प्रमुख युवराज देशमुख, उपायुक्त अविनाश सकपाळ आदी यावेळी उपस्थित होत. आयुक्तांनी पाहणी केल्यानंतर पुढील प्रमाणे प्रशासनाला सूचना दिल्या आहेत.

# सेंट जोसेफ स्कूलचा सीबीएसई दहावी निकाल १०० टक्के: दोन विद्यार्थ्यांना ९९% गुण





**शिरूर । प्रतिनिधी**

नुकत्याच जाहीर झालेल्या सीबीएसई इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या निकालात शिरूरच्या सेंट जोसेफ इंग्लिश मीडियम स्कूलने पुन्हा एकदा आपल्या शैक्षणिक गुणवत्ता आणि परिश्रमाचा ठसा उमटवत सलग सहाव्या वर्षी १०० टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवली आहे. यावर्षी एकूण १०८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती आणि त्यातील सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष म्हणजे संख्यात्मक निकालाबरोबरच गुणवत्तेच्या निकषावरही शाळेचा निकाल अत्यंत उल्लेखनीय ठरला आहे.

शाळेचे दोन विद्यार्थी कु. प्रांजल खामकर आणि अनुभव जांग्रा यांनी थक्क करणारे ९९ टक्के गुण मिळवत शाळेतीलच नव्हे तर तालुकास्तरावरही प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण शाळा, पालक, शिक्षकवृंद आणि स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे, समाधानाचे वातावरण पररले आहे.

# मोदींना विश्वगुरु मानणाऱ्या 'भाजप भक्तांनी' राऊतांचं पुस्तक वाचावं; 'नरकातील स्वर्ग' देव्हाऱ्यात पुजणाऱ्या वसंत मोरेंचा सल्ला

**पुणे । प्रतिनिधी**

ठाकरेंच्या शिवसेनेचे पुण्यातील नेते वंसत मोरे यांनी खासदार संजय यांच्या 'नरकातील स्वर्ग' या पुस्तक प्रकाशाच्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. या कार्यक्रमानंतर वसंत मोरेंनी या पुस्तकाची एक प्रत आणली असून ती त्यांनी आपल्या घरातील देव्हाऱ्यात ठेवली आहे.



त्यानंतर या पुस्तकातील काही पाने वाचल्यानंतर हे पुस्तक शिवसैनिक आणि आम्ही वाचणारच आहोत. पण हे पुस्तक वाचण्याची खरी गरज भाजपच्या लोकांना असल्याची प्रतिक्रिया वसंत मोरे यांनी दिली आहे. शिवाय यावेळी त्यांनी राऊतांनी पुस्तकामध्ये वास्तव आणि खरं लिहिल्याचं म्हणत पुस्तकावर टीका करणाऱ्यांना प्रत्युत्तर दिलं आहे.

नरकातला स्वर्ग हे पुस्तक वाचल्यानंतर माध्यमांशी बोलताना वसंत मोरे म्हणाले, नरकातला स्वर्ग पुस्तक मी घरच्या देव्हाऱ्यात ठेवून पुजलं. या पुस्तकातील मी आतापर्यंत ४० पाने वाचली. आम्ही शिवसैनिक म्हणून हे पुस्तक वाचणार आहोतच. पण हे पुस्तक वाचण्याची खरी गरज भाजपच्या लोकांना आहे.

आज मोदी विश्वगुरु होण्याची पायाभरणी शिवसेनेने केली आहे. मोदीसाहेब फडणवीससाहेबांनी हे पुस्तक वाचले पाहिजे. त्यांना देखील या पुस्तकातून प्रेरणा मिळणार आहे. ज्यांना विरोधात बसून राजकारण करायचे आहे त्याच्यासाठी हे पुस्तक आहे. या पुस्तकात कटू अनुभव असून हे एक प्रेरणादायी पुस्तक आहे. प्रत्येक शिवसैनिकाने हे पुस्तक वाचले पाहिजे. दरम्यान, यावेळी त्यांनी या पुस्तकातील बाजीराव मोदी हा विषय मला या सगळ्यात जास्त भावल्याचंही सांगितलं. ते म्हणाले, थोरले बाजीराव कुठे होते हे सर्वांना माहिती आहे. पुण्यातील भाजपवाल्यांनी (इगझ) हे पुस्तक वाचले पाहिजे. अटकेपार झेंडे लावण्याचे काम बाजीराव यांनी केले आहे. मला सुद्धा पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेवर भगवा झेंडा फडकावायचा आहे, असं म्हणत त्यांनी आपल्या मनातील निर्धार बोलून दाखवला.

# संवेदना, जाणिवा प्रगल्भ झाल्यास आदिवासी संस्कृती टिकेल - पंडित विद्यासागर

## आदिवासी चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन

**पुणे । प्रतिनिधी**

आदिवासी समाजासंदर्भातील संवेदना, जाणिवा प्रगल्भ झाल्यास आदिवासी समाज, त्यांची संस्कृती टिकण्यासाठी मदत होईल, असे मत स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू पंडित विद्यासागर यांनी व्यक्त केले. विद्यापीठांमधील भाषा विभाग, ललित कला केंद्रांच्या माध्यमातून आदिवासी समाजाची संस्कृती, बोलीभाषा टिकविण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

बहुरंग, पुणेतर्फे आयोजित १८ व्या आंतरराष्ट्रीय आदिवासी चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन सोमवारी (दि.१९) पंडित विद्यासागर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. हा महोत्सव पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनमध्ये (घोले रस्ता)



आयोजित करण्यात आला आहे. बहुरंग, पुणेचे अध्यक्ष डॉ. कुंडलिक केदारी, आदिवासी संस्कृती अभ्यासक ग. श. पंडित उपस्थित होते. राज्य सरकारचा सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या सहकार्याने महोत्सवाचे आयोजन केले आहे.

पंडित विद्यासागर म्हणाले, विस्थापन, मुलभूत सुविधा, आर्थिक प्रश्न, आरोग्य, शिक्षण हे आदिवासी समाजासमोरील मुख्य प्रश्न आहेत. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याविषयी दोन प्रवाह आहेत. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणल्यास त्यांची संस्कृती कशी टिकणार, आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात न आणल्यास त्यांचा विकास कसा साधणार असे प्रश्न उपस्थित केले जातात. आदिवासी प्रश्नांवर प्रकाश टाकण्यासाठी, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विद्यापीठाच्या माध्यमातून उपाययोजना राबविल्या जाऊ शकतात. सरकारस्तरावर आदिवासी विभाग आहेत. पण, आदिवासी समाजाची संस्कृती टिकविण्यासाठी या विभागाकडून कुठल्याही उपाययोजना राबविल्या जात नाहीत, असे डॉ. केदारी यांनी सांगितले. उद्घाटनानंतर विविध लघुपट दाखविण्यात आले. महोत्सवात सहभागी झालेल्या चित्रपट निर्मात्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. श्रीकृष्ण देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. आभार धीरज केदारी यांनी आभार मानले.

# ओझर येथे श्री विघ्नहर गणपती ट्रस्टचा सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात; १८ जोडप्यांचा शुभविवाह

**ओझर । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र ओझर येथे श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने आयोजित यंदाच्या वर्षातील दुसऱ्या सामुदायिक विवाह सोहळ्यात १८ जोडपी विवाहबद्ध झाली. हा भव्य सोहळा रविवारी (दि. १८) हजारो वऱ्हाडी मंडळींच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब कवडे यांनी दिली.

सकाळी गणेशपूजन, सुपारी फोडणे, साखरपुडा आणि टिळा लावण्याचे कार्यक्रम पार पडले. यावेळी भाजपा नेत्या आशाताई बुचके, विघ्नहर कारखान्याचे संचालक संतोष नाना खैरे, ट्रस्टचे अध्यक्ष बाळकृष्ण कवडे, उपाध्यक्ष तुषार कवडे, सचिव सुनील घेगडे, खजिनदार दत्तात्रय कवडे, विश्वस्त प्रकाश मांडे, सूर्यकांत रवळे, विनायक मांडे, माजी अध्यक्ष गणेशभाऊ कवडे, मुरलीधर घेगडे,



माजी खजिनदार किसन मांडे, कॉन्ट्रॅक्टर दुर्गा शेठ बेल्हेकर, रघुनाथ कवडे, ग्रामस्थ उपस्थित होते. वधू-वरांनी स्त्रीभ्रूणहत्या करणार नाही, करू देणार नाही, अशी शपथ घेतली.

सांस्कृतिक भवनच्या भोजन कक्षात ८,००० वऱ्हाडींसाठी रुचकर भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. शुद्ध पिण्याचे पाणी, वधू-वरांसाठी स्वतंत्र जानुसवाडे, वाहनतळ, स्वच्छतागृह यासारख्या सुविधांवर विशेष लक्ष देण्यात आले. वधू-वरांच्या पक्षाकडून आकारलेल्या रकमेतून हार, पुष्पगुच्छ, बाशिंग, कळसतांब्या, हळद साहित्य, मामांचे फेटे, सुवासिनींचा सत्कार, नवरदेवांचे टोप, टिळा लावणाऱ्यांसाठी टोपी, टॉवेल, अक्षदा आणि कन्यादान विधींसाठी आवश्यक साहित्य पुरवण्यात आले.

दुपारी नवरदेवांची मिरवणूक श्री विघ्नहर गणपती मंदिराकडे दर्शनासाठी निघाली. सनईच्या मंगलस्वरात विवाहमंचावर आगमन झाले. यावेळी आमदार शरददादा सोनवणे, ट्रस्टचे अध्यक्ष बाळकृष्ण कवडे, नारायणगावचे सरपंच बाबू पाटे, माजी अध्यक्ष शाकुजी कवडे आणि ओझरचे माजी सरपंच जगन्नाथ कवडे यांनी वधू-वरांना आशीर्वाद दिले. दुपारी सव्वाचार वाजता मंगल अष्टकांच्या सुमधुर स्वरात हा विवाह सोहळा संपन्न झाला.

सोहळ्याचे सूत्रसंचालन ट्रस्टचे व्यवस्थापक अशोक घेगडे यांनी केले. ट्रस्टच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. या सामुदायिक विवाह सोहळ्याने सामाजिक बांधिलकी आणि परंपरांचे जतन करताना आर्थिकदृष्ट्या मर्यादित कुटुंबांना आधार देण्याचे उद्दिष्ट साध्य केले. स्थानिक ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

# 'घोडीवर बसेन' म्हणणाऱ्यांनी बैलगाडा शर्यतीसाठी काहीच केलं नाही!; माजी खासदार शिवाजीराव आढळराव यांची टीका

**खेड । प्रतिनिधी**

घोडीवर बसेन... घोड्यावर बसेन... असे दावे अनेकांनी केले. मात्र, बैलगाडा शर्यती सुरू होण्यासाठी आम्ही न्यायमंदिरात लढाई लढली. दावा करणार्यांनी मात्र काहीच केले नाही, अशी टीका माजी खासदार तसेच म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यावर केली. बैलगाडा शर्यत बंदीविरोधात चाकण (ता. खेड) येथील तळेगाव चौकात केलेल्या आंदोलनात सहभागी झालेल्या आढळराव पाटील यांच्यासह ६७ जणांना राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने शनिवारी (दि. १७) निर्दोष असल्याचा निर्णय दिला. तब्बल २५ वर्षांनी लागलेल्या या निकालावर आढळराव पाटील यांनी रविवारी (दि. १८) लांडेवाडी (ता. आंबेगाव) येथे पत्रकार परिषद आयोजित करून माहिती दिली. यावेळी भैरवनाथ पतसंस्थेचे उपाध्यक्ष सागर काजळे, मंचरचे माजी उपसरपंच सुनील बाणखेले, पंचायत समितीचे माजी सदस्य रवींद्र करंजखेले, शिवाजी राजगुरू आदी मान्यवर उपस्थित होते.



बैलगाडा शर्यतबंदी, त्यानंतर झालेली आंदोलने, राजकीय तोटा, याबाबत आढळराव पाटील यांनी प्रतिक्रिया दिल्या. ते म्हणाले मी केले... म्हणणारे अनेक झाले. त्यांनी राजकीय पोळी भाजून घेतली. मात्र, भोसरीचे आमदार महेश लांडगे वगळता बैलगाडा शर्यतीसाठी कोणीही रस्त्यावर उतरले नाही. केसेस अंगावर घेतलेल्या नाहीत.

या क्षेत्रातील श्रेयवादातून आम्हाला गोवण्यात आले होते. राज्याचे तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी अशा केसेस मागे घेण्याचे जाहीर केले होते. त्यानंतर म्हणजे दोन वर्षांनी ३०७ (दंगल) कलम पोलिसांनी लावले. यामागे नेमके कोण होते? कुणाच्या सांगण्यावरून केले? याबाबत माहिती नाही.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे मिलन होऊ शकते. असे झाल्यास विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि तुमच्यात उमेदवारीवरून रस्सीखेच होऊ शकते. आपण पक्ष बदलणार का? तुमचे आणि शिंदे सेनेचे लागेबांधे पूर्वीप्रमाणेच आहेत का? यावर बोलताना आढळराव पाटील म्हणाले की, कारण असेल तर डॉ. अमोल कोल्हे यांच्यावर टीका करायला मागे-पुढे पाहणार नाही. माझे सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते यांच्याशी स्नेहाचे संबंध आहेत. राजकीय घडामोडी काहीही होवोत, मी त्यात बदल करीत नाही.

मात्र, मी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आहे. भविष्यात राजकीय स्थिती निर्माण झाली, तर याच पक्षाच्या माध्यमातून लोकसभा निवडणूक लढवणार आहे. राज्यात सध्याची राजकीय समीकरणे विचारात घेता येणार्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका सगळेच पक्ष लढवतील. अनेक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील, असे आढळराव पाटील म्हणाले.

# पुरंदरमध्ये लोकसेवा आयोग केंद्राची निर्मिती करणार

**सासवड । प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात लोकसेवा परीक्षेत उत्तीर्ण होणार्या विद्यार्थ्यांची संख्या पाहिली तर ती नगन्य आहे. तालुक्यातून लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणार्या परीक्षेत आपले विद्यार्थी चमकले पाहिजेत हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेऊन पुरंदर तालुक्यात लोकसेवा आयोग केंद्राची निर्मिती करणार असल्याचे प्रतिपादन आमदार विजय शिवतारे यांनी केले.

सासवड (ता.पुरंदर) येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक सभागृहात छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार शिवतारे बोलत होते. आमदार विजय शिवतारे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन जयंती सोहळ्याची सुरुवात करण्यात आली होती.

यावेळी समस्त हिंदू आघाडी परिषदेचे अध्यक्ष मिलिंद एकबोटे, जोतीष आचार्य पंकज महाराज निगडे, व्याख्याते कबीर महाराज निगडे, शिवसेना तालुकाप्रमुख प्रमुख हरिभाऊ लोळे, राष्ट्रपती मुख्याध्यापक पुरस्कार विजेते कुंडलिक मेमाणे, अठरा पगड बाराबलुतेदार प्रतिष्ठानचे राज्य अध्यक्ष आप्पासाहेब भांडवलकर, दादासाहेब थोपटे, संदिप लवांडे, योगेश खुटवड, पुरंदर सिंगिग गृपचा संचालिका सुजाता गुरव, पुणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनिल लोणकर, सोशल मीडियाने जिल्हा उपाध्यक्ष राहुल शिंदे, अक्षय कोलते, गिरीश जगताप, आबा लोळे आदी उपस्थित होते.

आमदार शिवतारे म्हणाल की, तालुक्यात लोकसेवा परिक्षेचा आभ्यास करण्यासाठी पुरेशा सुविधा नाहीत. तसेच येथील शेतकर्यांना शिक्षणासाठी आपल्या मुलांना मुंबई, दिल्ली या ठिकाणी शिक्षणासाठी ठेवणे परवडत नाही. म्हणून या मुलांना हे शिक्षण तालुक्यातच मिळाले पाहिजे. यासाठी पुरंदर तालुक्यात लोकसेवा आयोग केंद्राची निर्मिती करणार असून याच ठिकाणी रहाणे व भोजनाची व्यवस्था केली जाईल असे आमदार शिवतारे यांनी सांगितले. यावेळी कबीर महाराज अत्तार व मिलिंद एकबोटे यांनी महाराज छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याची माहीती सांगितली छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन पोटे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन माऊली भिसे यांनी तर हरिभाऊ लोळे यांनी आभार मानले.